# जयजयवन्ती

स्फुट कवितांचा संग्रह

सदाशिव अनन्त शुक्ल

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. १२९३

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

मूल्य अडीच रुपये


सदाशिव अनन्त शुक्ल

# जयजयवन्ती

स्फुट कवितांचा संग्रह

सदाशिव अनन्त शुक्ल

REFBK-0007649
REFBK-0007649

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

मूल्य अडीच रुपये

सर्वाधिकार सुरक्षित

पहिली आवृत्ति : जानेवारी १९५५

मुद्रक
बा. ग. ढवळे
कर्नाटक मुद्रणालय,
चिराबाजार, मुंबई २

प्रकाशक
के. भि. ढवळे
कर्नाटक हाउस,
चिराबाजार, मुंबई २

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम १८०८३५
विभाग ल. कादं
क्रमांक १२८३
नों. दि. १०।२।८५
वाचनालय शाखा

मा झ्या व र
माझ्याहून प्रेम करणाऱ्या
प्रे म ळां स ...

अनुक्रम
विभाग
नों. दि.

# नि वे द न

'जयजयवन्ती' हा माझा नवीन कवितासंग्रह वाचकांच्या हातीं देतांना आज मला साहजिकच आनंद होत आहे.

साधारणपणें सन एकोणीसशें बावीस ते एकोणीसशें बेचाळीस ह्या वीस वर्षांच्या काळांतील माझ्या स्फुट कविता प्रस्तुत संग्रहांत संकलित केल्या आहेत. ह्या कविता मीं 'कुमुदबान्धव' ह्या नांवानें लिहिल्या असून बृहन्महाराष्ट्रांतील प्रमुख नियतकालिकांतून वेळोवेळीं प्रसिद्ध झाल्या आहेत.

माझ्या स्फुट कवितांचा पहिला संग्रह सन एकोणीसशें सव्वीस सालीं 'कुमुदबान्धव' ह्या नांवानें प्रसिद्ध झाला. त्यानंतर सन एकोणीसशें सदतीस सालीं प्रसिद्ध झालेल्या 'सुनीतिका' ह्या माझ्या सुनीतसंग्रहांत त्यांतील सुनीतें मीं समाविष्ट केलीं. 'कुमुदबान्धव' मधील सुनीतें वगळून उरलेल्या कांहीं निवडक कवितांचें परिष्करण करून त्यांचा मीं प्रस्तुत संग्रहांत समावेश केला आहे.

ह्या संग्रहांतील 'दीपकहाणी' ह्या कवितेची मध्यवर्ति कल्पना परभाषेंतील एका कवितेवरून सुचली असून 'मार्ग चाल एकला' ही कविता रवीन्द्रनाथ टागोरांच्या 'एकला चल' ह्या गीताच्या आधारें लिहिली आहे.

'जयजयवन्ती' मधील कवितांना योग्य तेथें वृत्त, जाति, छन्द ह्यांचीं नांवें डॉ. माधवराव पटवर्धन तथा कविवर्य माधव ज्यूलियन् ह्यांच्या 'छन्दोरचना' ह्या पुस्तकांतील दिलेलीं आहेत.

एकोणीसशें चौतीस सालापासून ध्वनिमुद्रणासाठीं आणि पुढें चित्रपटांसाठींही मी गीतें लिहूं लागलों आणि गेल्या वीस वर्षांत:तींच माझ्या हातून शेकडों लिहिलीं गेलीं. त्या गीतांचे पांच संग्रह निरनिराळ्या नांवांनीं प्रसिद्ध झाले आहेत.

अगदीं पहिली वहिली कविता मीं लिहिली, तेव्हांपासून अनेक सुहृदांनीं, हितचिंतकांनीं माझ्या कवितेविषयीं आपुलकी, अभिमान बाळगून तिला आजवर सतत प्रोत्साहन दिलें आहे. महाराष्ट्रीय जनतेनेंही तिचें माझ्या कल्पनेपेक्षां जास्त कौतुक केलें आहे. हें येथें कृतज्ञतापूर्वक नमूद केल्याशिवाय माझ्याच्यानें राहावत नाहीं.

शेवटीं, मराठी काव्यप्रेमी रसिकांच्या यथोचित स्वागतास ही 'जयजयवन्ती' पात्र होईल अशी आशा प्रकट करून हें निवेदन पुरें करतों.

सदाशीव अनन्त शुक्ल

श्रीसमर्थसदन
मुंबई ४
मकरसङ्क्रमण १८७६
१४ जानेवारी १९५५

# अनुक्रम


| | | | |
|---|---|---|---|
| जयजयवन्ती | १ | प्रणयकथा | ३२ |
| आले गेले कितिक | २ | जोगीण | ३३ |
| चाललें रण ! | ३ | मीच वेडी नाचरी | ३४ |
| तुझा तूंच जगीं देव | ४ | दे मोहास रजा | ३५ |
| आसरा | ५ | मी कसें तुझ्यावर प्रेम करूं ? | ३६ |
| विचार | ६ | आस | ३७ |
| स्वर्गीय सङ्गीत | ७ | कलङ्कित राजसा | ३८ |
| हासऱ्या बालिकेस | ८ | कौमुदी-महोत्सव | ३९ |
| ध्यास | ९ | हळु बोल ग मैना | ४० |
| हुरहूर | १० | पिञ्जऱ्यांतील पोपटास | ४१ |
| येणार कधीं ? | ११ | तारकेस | ४२ |
| चाहूल | १२ | ढेंकळास | ४३ |
| तान्हुला | १३ | सत्याग्रही | ४४ |
| ऊठ सोनुल्या | १४ | अहंमन्यास | ४५ |
| कोकिळास | १५ | आकाशदिवा | ४६ |
| निर्झरास | १७ | दीपावळी | ४७ |
| आपदा थोरांच्या थोर | १९ | लक्ष्मीपूजन | ४८ |
| आशा | २१ | मकरसङ्क्रान्त | ५१ |
| सूर्य-सन्देश | २२ | चल नेटानें पुढें ! | ५३ |
| मार भरारी जपून | २३ | वेडा ! | ५४ |
| कीर्ति ! | २४ | उषा | ५५ |
| दे अवधान ! | २५ | रजनी | ५६ |
| दीप-कहाणी | २६ | वर वर हसतों | ५७ |
| आलों एकत्र आपण | २७ | नाहिं बोलणार | ५८ |
| नित्य वसन्त न लाभला | २८ | निर्धार | ५९ |
| माळीण | २९ | प्रीतिविना | ६० |
| लावण्यलक्ष्मी | ३१ | तूं दिसल्यापासून | ६१ |

| | | | |
|---|---|---|---|
| कां तळमळशी ? | ६२ | कल्किचा जन्म फुका | ८३ |
| मरणा ! | ६४ | येणार तूं म्हणून | ८४ |
| उद्भ्रान्त | ६६ | वर्ण तुझा सांवळा | ८५ |
| मनें मिळालीं पण... | ६७ | निरोप | ८६ |
| लपण्डाव | ६८ | वीरवन्दन | ८७ |
| बोल सुधेचा बोल | ७० | इथें आणि तिथें | ८८ |
| द्या झणीं विषाचा पेला | ७१ | देवा ! | ८९ |
| तोड ही माला ! | ७४ | सन्थ जरा वहा | ९० |
| विसरूं कशी ? | ७५ | कृतघ्नता ! | ९१ |
| प्रीतिखुणा पटल्या ना ? | ७७ | हृदय राहिलें भुकें | ९२ |
| प्रश्नोपनिषद् | ७८ | तो देव माझा ! | ९३ |
| अनुभव-कोशांत | ७९ | मार्ग चाल एकला | ९४ |
| दावि मार्ग नीट | ८० | तुज आलों शरण | ९५ |
| लोकमान्य गेले... ? | ८१ | नन्दादीप | ९६ |

बह्यात्तराव्या पृष्ठावरील ‘ रुजविलें पीक सत्याचें ’ ही वरून तिसरी ओळ ‘ रुजविलें बीज सत्याचें ’ अशी वाचावी.

## जयजयवन्ती !

[ जाति : स्वर्गङ्गा

मानवतेच्या अधरीं भिडला
प्रलयाचा जहरी प्याला
न्यायनीतिची घेति आहुती
धडधडत्या हिंसा–ज्वाला !

दुक्ख–दैन्य अवकाळ भयङ्कर ;
माणुसकीची तर होळी !
असुर–वृत्तिचें प्रचण्ड ताण्डव ;
बुडलें जग हलकल्लोळीं !

नव्या जगाची नव्या युगाची
परन्तु अन्तरिंची ग्वाही
दिगन्ति समता–साम्राज्याची
पसरणार अवघी द्वाही !

सकल जगावर आज उसळला
अशान्ततेचा जरि डोम्ब
उगवणार ह्यांतून उद्यांच्या
नवीन जगताचा कोम्ब !

स्वार्थाची रणरङ्गधुमाळी,
विलापिका थाम्बुनि अन्तीं
शान्तिसुखाची चिरन्तनाची
घुमेल जगीं जयजयवन्ती !

## आले गेले कितिक !

[ जाति : पादाकुलक

आले गेले कितिक आजवर
कुणी न तरले कालाब्धीवर
शाश्वत आणि चिरन्तन नश्वर
नान्दला न अवतार कुणाचा !

दिवस जन्मतो रात्रीपोटीं
भरतीमागुनि ये ओहोटी
कालगती ही विचित्र मोठी
सन्तत ना व्यापार कुणाचा !

तिमिरांतुनि चान्दण्या उमलती
तेजांतुनि तमराशी फुलती
सौख्यस्मृति दुक्खांतुनि खुलती
निरन्तर न संसार कुणाचा !

लीलालाघव हें देवाचें
खेळ मानिती कुणि दैवाचे
कोडें विश्वाचें, जीवाचें !
स्थिर न विवेक, विचार कुणाचा !

मृत्यू जीवनवियोग–क्षण
जीवन पण मृत्यूचें लक्षण
नियति थोर बलवती विलक्षण
चालतो न अधिकार कुणाचा !

## चाललें रण !

मार्ग अपुले बदलले पण
चाललोंत अजून आपण !

एक उज्ज्वल दीपज्योती
एक फिरत पतङ्ग भोंतीं
एकरूप जरी न होती
उभयतां जळती क्षणोंक्षण !

क्षुब्ध चञ्चळ लाट झगमग
क्षुद्र मचवा डुलत डगमग
किति, कसा राहील तग मग?
नित्य तगमग ती विलक्षण !

जड पदें मी पथिं रखडतों
पण तुझा तर पथच अडतो
पाश नव नव पदिं जखडतो
प्रगतिचें हें काय लक्षण?

कटु जिणें जीवन्मृताचें
भग्न एकाकीच अमुचें
आणि जीवन नांव ह्याचें !
चाललें रण ! काय कारण?

# तुझा तूंच जगिं देव !

दोषुनि देवा, दैवा रडसी ; कां टाकिसि निःश्वास ?
हताश होऊं नको, धीर धर जोंवर चाले श्वास !

'ग्रह फिरले'... हें कां रडगाणें ?
ग्रह फिरती, नित इष्ट समजणें
जरी थाम्बती त्यांचीं भ्रमणें
प्रळय जगाचा खास !

आज जरी प्रतिकूल, उद्यां तें
ग्रह-भ्रमण अनुकूलच होतें
काळचक्र हें अखण्ड फिरतें
ग्रहगति फिरवी त्यास !

निज दैवाचा तूंच नियन्ता
झुगार भेकड विचारकन्था
व्यर्थ वागवुनि अन्तरिं चिन्ता
मुकसी शान्तिसुखास !

प्रयत्न राबवि ऋद्धी सिद्धी
उद्योगानें सुख-समृद्धी
जगीं यशाची अर्धी सिद्धी
थोर आत्मविश्वास !

तुझा तूंच जगिं देव परन्तू
आणुं नको मनिं भलते किन्तू
सत्व-शील-बल वरशिल जरि तूं
जिङ्कशील विश्वास !

## आसरा

[ जाति : महात्मवती

आसरा एकला तुझाच जगदाधारा,
तापला जीव, वर्षवी कृपामृतधारा!

वडवाग्नि अन्तरीं, शान्त दिसे जरि सिन्धू
भोगितो कळा परि हसतो वर वर इन्दू
भवसागर खवळे, मिळे न जीवनबिन्दू
कोण्डला जीव हा, पण फुटला बन्धारा!

विसरला दयाळा, कां ब्रीदाचा बोल?
किति अन्त पहावा? विश्वचालका, बोल!
लागले अशानें तुझ्या यशाला बोल
उद्भ्रान्त अन्तरीं प्रळय हो महोदारा!

स्नेहार्द्र फेक तूं एकच कृपाकटाक्ष
जो तुझ्या दयेची पुरती पटविल साक्ष
फुलविल जीवित हें रुक्षच विफलाकाङ्क्ष
थारा नच नन्तर हृदयान्तरिं अन्धारा!
आसरा एकला तुझाच जगदाधारा!

## विचार

विचार कोठुनि कसा प्रगटतो
अवचित मानसमन्दिरिं नटतो ?
मुद्रेवरि परि ठसा उमटतो
तारक मारक मनोबलाचा वीर जगज्जेता नामी
पूर्वज हा करणीचा
जनक खरोखर वाणीचा
जड दृष्टीला दिसे न भासे ; निज बल दावी परिणामीं !

जिङ्की तनु—मन नवल कशाचें !
स्थिरचर वातावरण भंवतिंचें
करी खेळणें निज सत्तेचें
विचारलहरी सूक्ष्मतम तरी प्रभावशाली अतुलच ती
नाश करी अव्याप्ति
नाशक तशिच अतिव्याप्ति
बरें-बुरेंपण ह्याचें वितरित उन्नति अवनति ह्या जगतीं !

जीवनरस हा जीवात्म्याचा
कर्णधार भवसागरें साचा
'विचार' धाता जगीं यशाचा
जगदुत्क्रान्तीचा ध्वज मिरवी दिव्य प्रेरक शक्ति खरी
मूर्खांचा हा वैरी
सुजनांचा परि कैवारी
अखण्ड लाभो ह्याची मजला सौख्यद सङ्गत संसारीं !

## स्वर्गीय सङ्गीत !

[ जाति : नववधु

मन रमे गायनीं मोहरुनी
घुमतसे नाद हृदयीं भरुनी !

मङ्गलमय सुप्रभातकाळीं
शान्तिरसानें सृष्टि नहाली
विश्ववृत्ति आनन्दित झाली
फिरत मी परि वनीं झुरत मनीं !

श्रवणमधुर आलाप मनोहर
स्वरविलास अति मादक सुस्वर
किन्नरकण्ठी जादु निरन्तर
नव गान भान नेई हरुनी !

मधुमङ्गल सङ्गीतमोहिनी
गात बसे वनिं लपुनी छपुनी
अमरगुणी गन्धर्व का कुणी ?
जग भारितसे किमया करुनी !

अनन्त मरणें सन्तत साहिन
परन्तु धुण्डुनि नयनीं पाहिन
तुला गायका, जीवित वाहिन
विसरुनि मीपण, तूंपण वरुनी !

गान तुझें स्वर्गीय सकौतुक
निशिदिनिं ऐकत बसेन सन्मुख
सेविन जीवनिं रुचिर शान्तिसुख
जाईन दिव्य गायनिं विरुनी !

## हांसऱ्या बालिकेस ! [जाति : श्यामाराणी

हांसऱ्या बालिके, हास हास !
ही सुवर्णसन्धि अमोल खास !

शुभ्र चान्दणें फुललें, न कळे
छान गुलाबांचेच कीं कळे
गोड तुझें हांसणें मोकळें
आनन्दें फुलवी जगास !

नन्दनवन हें बाल्य खरोखर
सदाफुली तूं सुखद मनोहर
निर्मळ हृदयतरूचा मोहर
हास्य तुझें उधळी उल्हास !

स्वप्न ओसरुन बाळपणाचें
जिवा जखडतिल बन्ध जगाचे
रुक्ष जिणें कटु कृत्रिमतेचें
परिस्थितीचा घोर फांस !

कठिण अनुभवांचेच निरन्तर
घेउनि कडवट घुटके नन्तर
करपुनि जाइल कोमल अन्तर
मुकशिल मग तूं शांतिसुखास !

ओळख नाहीं भल्याबुऱ्याची
स्वार्थी दाम्भिक कुटिल जगाची
शल्य न कसलें जिवास जाची
खुशाल तोंवर अशीच हांस !

# ध्यास

गोड हांसऱ्या फुला !
बोल, विनवुं किति तुला ?

तुडवित पदिं रानमाळ
भटकत मी तिन्हि त्रिकाळ
जीव कळवळे व्याकुळ
    कशि न ये दया तुला ?

चहुंकडे फुलेंच फुलें
गन्ध मधुर दरवळे
धुन्द जग डुले फुले
    जीवभाव लोभला !

पुष्पलोक किति सुरेख !
सुमनतारका अनेक
करिति सौख्यसुधासेक
    हृदयिं बाग बहरला !

स्वप्नसृष्टिची किमया
नवल मोहिनी-माया
वैभवास तव राया,
    ना दिसे जगीं तुला !

नितान्त शान्ति निर्मला
तुझ्या जगांत प्रेमला,
विमल रुचिर कोमला,
    सुमनरूप करि मला !

रमुनि तुझ्या सङ्गतींत
झिजविन तनु जनहितार्थ
जीवित मम तरि कृतार्थ ;
    ध्यास हाच लागला !

# हुरहूर

[ अभङ्ग

तुझ्या दर्शना भुकेला जीव माझा कळवळे
कृपादृष्टि कधीं वळे?

शान्तवाया कां टाळसी देवा, अन्तरींची भूक?
काय झाली माझी चूक?

आतुरला व्याकुळला तुझ्या भेटीसाठीं जाण
उभा डोळ्यांमध्यें प्राण !

किति कसा तुला वाहूं? वाट कुठवर पाहूं?
भावफुलें कोणा वाहूं?

दाटे काहूर, कोन्दाटे हुरहूर विलक्षण
युग वाटे क्षण क्षण!

नेत्र-नीराञ्जनीं भावें जीवज्योती पाजळीन
पञ्चारती ओवाळीन!

हृदयाच्या राऊळांत विराजला जगजेठी
कधीं प्रत्यक्ष हो भेटी?

## येणार कधीं ?

[ वृत्त : साशङ्क ; गझल

येणार कधीं राया ? मी वाट किती पाहूं ?
अङ्गार वियोगाचा हा साङ्ग कसा साहूं ?

आशेवर जीवाला टाङ्गून किती ठेवूं ?
का स्वप्नतरङ्गीं रे गुङ्गून सदा राहूं ?

नाचे मनिं आशेचें ऐश्वर्य वसन्ताचें
कां कोकिळ प्रीतीचा बोले न कुहू कूहू ?

अश्रूजल शिम्पोनी जीं राखियलीं ताजीं
हीं भावफुलें माझीं पूजून कुणा वाहूं ?

तूं भृङ्ग, चमेली मी ; तूं चन्द्र, चकोरी मी ;
हो जीव सुना, तुझ्यावांचून कुणा बाहूं ?

थैमान तुफानाचें ! मृत्यूच शिरीं नाचे !
ही नाव बुडे, आतां आधार तुझा बाहू !

प्रीतीस जुळे प्रीती, ज्योतीस मिळे ज्योती
हृद्दीप जळे ; तेजीं स्वच्छन्द सुखें नाहूं !

ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम ९८८०३
विभाग २७ क/०४
क्रमांक १२
नों. दि.
वाचनालय शाखा

## चाहूल !

[ राग : जोगीमिश्र ; ताल : केरवा

कशि पडली भूल
जिवाला कशि पडली भूल
टाकतांच नवयौवनप्रान्तीं पहिलें पाऊल ?

मधुर छटा वृत्तींत लाजरी
नजर निराळी बनली बुजरी
उठली न कळे कुठुनि साजरी
मनिं अवचित हूल !

काय हवें मज ? मलाच नुमगे
गोड ओढ पण विचित्र लागे
थरथरले हृदयाचे धागे
उरिं भरला शूल !

भासलेंच जग नवखें नवखें
मनिं फुललें चान्दणें सारखें
ओळखली मी प्रीतिची सखे,
पहिली चाहूल !

## तान्हुला

[ जाति : बालमुकुन्द

सखि, गोड गुणाचा गोण्डस हा तान्हुला
किति किती गुणी
अति सुलक्षणी
बघ माझा सोनुला !

हा बालमुकुन्दच गृह–गोकुळिं विहरतो
हा बालभानु मम हृदयकमल फुलवितो
हा ध्रुवतारा कीं जीवनपथ उजळितो
करिं स्वर्गच हा
खेळतो पहा !
भाग्याला नच तुला !

बोबडे बोल मकरंद मुखाम्बुजिं झरे
हे ओठ चिमुकले अमृताचे ग झरे
हांसरे नेत्र तेजाळच गहिरे हिरे
किति परोपरी
मी वानुं तरी
ह्या हृदयाच्या फुला ?

# ऊठ सोनुल्या !

[ जाति : गाधिज

ऊठ रे ऊठ झणीं बाळा,
निशा सम्पली, दिशा उजळल्या बघ रे वेल्हाळा !
मनोहर अरुणोदय झाला
बालभानु ये उधळत भुवनीं मङ्गल तेजाला !
डोलतें उपवन आनन्दें
दरवळला सुमनांचा परिमळ दशदिशांत कोन्दे !
मोगरा, गुलाब, शेवन्ती
जाइजुई, गुल्बशी, मालती, जास्वन्दी फुलती !
पांखरें भरारती गगनीं
स्वैर लकेऱ्या छेडित गाती मधु सुन्दर गाणीं !
पावरी मञ्जुळ वाजविती
नेति गुराखी रानिं चराया गुरेंवासरें तीं !
बालिका गातच भूपाळ्या
करुनि सडा-सम्मार्जन अङ्गणिं काढिति राङ्गोळ्या !
अजुनि किती निजायचें बाळ ?
नेत्रकमळ उमलुं दे; वदनमणि हसुं दे तेजाळ !
वाजुं दे रुमझुम हा वाळा
ऊठ सोनुल्या, चिमण्या अरुणा, लगबग लडिवाळा !
पुरे हा झोंपेचा चाळा
खुदकन् हांस जिवाच्या राजा, माझ्या घननीळा !

## कोकिळास

[ जाति : शिवराज

सख्या कोकिळा,
गा सृष्टिसतीच्या बाळा!

हांसत नाचत वसन्त आला
नव नवलाच्या दावित लीला
बघ वेल्हाळा!

हंसरी हिरवी दुनिया फुलली
नवशृङ्गारें नटली खुलली
वसुधा बाला!

गोड गोड छेडित ललकारी
स्वैर उन्च अम्बरीं भरारी
घे लडिवाळा!

सृष्टि-महाकवि तूंच खरोखरी
विश्वगीत आळविशि परोपरी
राजस बाळा!

रसिकां रिझवी तव कवनाचा
आनन्दाचा मधुर सदाचा
मोहक चाळा!

ताल निरन्तर धरितो निर्झर
तान घेत वनवायुहि सुस्वर
जमला मेळा!

रङ्गलाच जलसा भरदार
शुक, पिक, बुलबुल साथीदार
तुझे रसाळा !

जडासि लाभत नव जीवकळा
जगदान्तरिं उसळे स्नेहाळा,
हर्ष-उमाळा !

फुलव डुलव रे मनाचा मळा
ओतुनि मञ्जुळ मोकळा गळा
जादु निराळा !

मधु कूजन कानीं मनिं घुमुं दे
असाच गा चिरकाल तूं मुदें
कां कण्टाळा ?

## निर्झरास

[ जाति : नृपममता

तूं वसुन्धरेचा छकुला
लाडका लाल सोनुकला निर्झरा !
गुञ्जसि मञ्जुळ दिनरात
रञ्जवी तुझें सङ्गीत अन्तरा !
बागडसि, नाचसी, पळसी
तरुराजींतुन झुळझुळसी सुन्दरा !
चाल : फुलवितो, जीव खुलवितो
जगा भुलवितो तुझा लडिवाळा,
खेळाचा अवखळ चाळा साजरा

मखमली गालिचा गार
नटली हिरवळ गुलजार ही भली
वर पंखरण कळ्याफुलांची
दंव-मोत्यांची नवलाची शोभली
जीवनपथ सुखदच सजला
वैभवें अलौकिक तुजला लाभलीं
चाल : स्वातन्त्र्यसौख्य तें दिव्य
सेविशी धन्य तूंच ह्या जगतीं
दिङ्मूढ वृत्ति तुजला ती लोभली

पथ दिसे न गवसे पुढतीं
माजलें धुकें मजभोंतीं दाट तें
जीवास जाळि हुरहूर
चित्तांत सदा काहूर दाटतें

रमुनी तुजसङ्गें गावें
जगिं जिणें स्वतन्त्र जगावें वाटतें

चाल : डोहसें सांचलें असे
भयाणच दिसे, जहरलें भासे
स्थिर अगतिक जीवन माझें आटतें !

हा तुझा प्रवाह खळाळे
नव सुन्दर तेज झळाळे किति पहा !
धांवता अखण्डित ओघ
वाढताच वेग अमोघ सतत हा
करि निर्मळ जीवन–लास्य
उधळीत असेंच सुहास्य तूं वहा !

चाल : मन धुन्द, नुरे निर्बन्ध
तुझा हा छन्द सदा सुखकन्द
रात्रन्दिन आत्मानन्द ! तुज महा !

## आपदा थोरांच्या थोर !

[ जाति : माधवकरणी

महापूर झञ्झावातहि तो माण्डित कल्पान्त
धरोनी प्रलयरुद्ररूप
प्रचण्ड वृक्षहि उन्मळुनी जंव समस्त आकान्त
लव्हाळे वांचति सुखरूप !

अभङ्गवाणी बोल अनुभवाचेच जगालागीं
वदे तो तुकाराम सन्त
कठिण यातना तयां, जयांच्या मोठेपण अङ्गीं
त्रिकालाबाधित सिद्धान्त !

इमारतीवर उञ्च प्रासादासम उत्तुङ्ग
कडाडे वीज जाळणारी
आधिं कोसळे कळस आणि मग देवालय–भङ्ग
दृश्य हें दिसतें व्यवहारीं !

लाविति कसास काञ्चनास
कधिं न परि हिणकस लोहास

विचन्द्रांना लागति गगनीं ग्रहणें खग्रास
उपाधि न कधिं ती ताऱ्यांस !

प्रयत्नवादी सुधीर सज्जन कर्मवीर धरिती
पताका करिं कर्तव्याची
उज्ज्वल निजकर्तृत्त्वबलें पद उच्च पहा वरिती
यशःश्री धांवुन ये साची !

परन्तु थोरांनाच ह्या जगीं त्रास कष्ट खास
कसोटी ती कर्तृत्त्वाची !
नाना विपदा, विटम्बना, खल–निन्दा, उपहास
परीक्षा अखण्ड सत्वाची !

सामान्यांहुनि भिन्न आपदा थोरांच्या थोर
कांस तरि धरुनी तत्त्वांची
वन्द्य विभूती ध्येय गांठिती धैर्यें; घनघोर
शिरीं जरि वृष्टि सङ्कटांची !

ध्येयवाद्यांस जगीं क्लेश
सुखाचा कधिं नच लवलेश

कर्तव्या जागवी जगीं नरवीरांस हमेश
विघ्नरूपानें परमेश !

## आशा

का. क्र. ८०७९

[ जाति : बालानन्द

आशा अवखळ सुरबाला
गुञ्जवि अवघ्या जगताला
मुग्ध मनोहर गुणशीला
दावि रम्य अद्भुत लीला
प्रकटवि दैवी तेजाला
पसरी मधु मायाजाला
क्षणाक्षणाचें
नवेंच साचें
नवलाईचें
स्वरूप तें सौन्दर्याचें
नवरङ्गहि चातुर्याचे !

उञ्च उञ्च उड्डाण करी
वसत कधीं नच अवनिवरी
धांव हांवरी अधान्तरीं
रीत हिची विपरीत खरी
हासत नाचत पिश्यापरी
विश्वगोलसञ्चार करी
वेन्धळी पुरी
आन्धळी तरी
गगनिं दिगन्तरिं
सदा स्वैर विहरेच परी
दैना चाले परोपरी !

मञ्जुळ वीणेसम वाणी
गोड गोड गाते गाणीं
सकल जगाची ही राणी
भुलवी चेटकिणीवाणी
स्वर्गसुखाची ही श्रेणी
करणी परि जीवघेणी
कुणां हंसविते
कुणां रुसविते
कुणां फसविते
खेळ जादुचा भासविते
लीलालाघव तोषवि तें !

भग्न मनोरथ होत असे
खेद खन्त अन्तरीं नसे
हृद्वीणा भङ्गली दिसे
खुळी तरीही गात बसे
आपत्तींच्या अग्निरसें
जळली ही तरिही हांसे
वळुन ना बघे
पुढें धांव घे
मुळिं न डगमगे
येती जाति अनन्त युगें
सेवि अमरपद ही अवघें !

## सूर्य - सन्देश

[ जाति : भूपति

घनघोर रक्तरङ्गण रणकन्दन चाले
गगनाङ्गण अवघें समराङ्गणसें झालें
फडफडे आरुणी विजयध्वज पूर्वेला
रविकिरण वीर हे तमरिपुरुधिरें न्हाले !

तमनाश आणि सुप्रकाशदानच बाणा
साधितो लोकहित विश्ववन्द्य रविराणा
चैतन्य, तेज, नवजीवन जगता द्याया
उदयाचल-सिंहासनीं अधिष्ठित जाणा !

रङ्गल्या दश दिशा ! उल्लासाची ग्वाही
दुमदुमे दिगन्तरिं कर्तव्याची द्वाही
सन्देश देतसे दिव्य निरन्तर सूर्य
'निःशङ्क आत्मबल जिङ्की काळालाही !'

'आक्रमी यशोगिरि-पन्थ बिकट, सोपा न;
झुञ्जार सदा करि आपदाग्निरसपान
तो थोर कर्मयोगी जगिं धन्य विरागी
हक्कानें हांसत चढे स्वर्गसोपान !'

## मार भरारी जपून !

[ जाति : अञ्जनी

मार भरारी जपून
    पांखरा, मार भरारी जपून !
नकोस नाचूं स्वच्छन्दानें
    देहभान हरपून !

नाहिं अजुनि दुनियेची ओळख
भल्याबुऱ्याची नाहीं पारख
    उगाच भलत्या छन्दें काळिज
    घेउं नको करपून !

नवतीचा ऋतु वसन्त फुलला
नूर नवा नवलाचा खुलला
    हुरळुं नको, बोचतील कांटे
    तुला फुलांत लपून !

राहुं नको गाफिल, बेसावध
सहज अचानक होइल पारध
    चतुर शिकारी टपून बसले
    जागोजाग छपून !
मार भरारी जपून !

## कीर्ति !

[ छन्द : परिलीना

हपापून जाशी लौकिकासाठीं
धांवशी कां वेड्या, कीर्तीच्यापाठीं ?

कां स्वयंशिष्टाचा डौल ?
सत्कीर्ति देते न कौल

केवळ गुणांना भाळेना कधीं
परिस्थितिवश लोकीं प्रसिद्धी !

कीर्ति खरोखर ही पडछाया
दूर दूर पळे जातां धराया

खट्याळ ही महामाया
वांकुल्या दाविते वायां

आपण आपुल्या सन्मार्गें जावें
ती पण मागूती धांवे स्वभावें !

स्वाभिमानशून्य बनोनी लाचार
उगवता सूर्य पूजिसी साचार

कां परनिन्दा कुचेष्टा ?
लाभे का तूंतें प्रतिष्ठा ?

बेगडी राक्षसी आकांक्षा-सिद्धी
पैशानें पाहसी करूं खरेदी !

खोटी हांव पोटीं मोठेपणाची
ओठीं भाषा पण निस्स्पृहत्वाची

दिसाया उच्च जगाला
खणशी भोंतीं कशाला ?

गारुडी ढोलकें वाजवी खूप
ओळखतें जग खरें स्वरूप !

कर्मवीर थोर भूषण जगा
कीर्तिसाठीं का रे कष्टले उगा ?

सफल सत्कृत्य-छन्द
कोन्दला कर्तृत्वगन्ध

काळाला जिङ्कीत सद्यशोमूर्ति
अखण्ड राबते बटीक कीर्ति !

## दे अवधान !

तुज सुचेल रुचेल तें तें
कर खुशाल कांहींही दयिते !

पाहुनि मम हृद्‌वेदना सदा
उपहासानें हांस खदखदां
पण जाण आंसवांचेंच रूप जगिं
हास्य अखेरीला घेतें !

बघुनि जिता जळतांना मजला
समाधान सुख लाभो तुजला
पण असें क्षणाचें सुख अन्तरिंचें
दुक्ख निरन्तरचें होतें !

लाथाडुन फुलत्या प्रीतीला
तुडवुन जा माझ्या हृदयाला
पण हृदयशल्य मम बोंचेलच तुज
दे अवधान गडे, पुरतें !

सार्वभौम मी ! अखण्ड गाती
पतङ्ग सुन्दर मद्‌गुणगान
अन्धकार माझ्या चरणांशीं
शरणागत करि जीवितदान !
स्वर्णमुकुट शिरिं उज्ज्वल शोभे
लाभे उच्चासन, सन्मान
प्राप्त सकल मज सौख्यसाधनें
जगांत ठरलों मी श्रीमान् !
परन्तु न कळे माझें मजला
खराच का मी सुदैववान् ?
स्नेहाङ्‌कित मी जगास जिङ्‌कित
पण जळतों मी बनुनि अजाण !
तिळतिळ जळतें सन्तत अन्तर
करहि दग्ध मम जीवनप्राण
स्वतां गिळुनि अन्धार, जगाला
सदैव करितों प्रकाश-दान !
रात्र जगाची तो दिन माझा,
दिवस जगाचा मम अवसान ;
उज्ज्वल जीवन ! त्याची स्मृति पण
काजळ काळें कालसमान !
दुर्दैवच कीं सुदैव माझें
पूर्वपाप अभिशाप महान् ?
मानूं अंतरिं खेद, मोद वा
जिणें शाप अथवा वरदान ?

## आलों एकत्र आपण !

वादळाची काळरात
पिसाळला झंझावात
योग सुदैवाचा पण
आलों एकत्र आपण !

नाहीं सोबत कुणाची
आग एकलेपणाची
किती कशी साहूं वायां ?
साङ्ग सहकारा राया !

कोळपून गेली पार
फुलवेल निराधार
जरी भोंतीं बागशाही
उरीं पेटे आग-खाई !

आजवरी शोक-पूर
चिरविरह, काहूर
परि आतां भाग्य साचें
जीव-शिव भेटायाचें !

जीव धुन्द, पडे भूल
उठे प्रळयाची हूल
तरीही शुष्क मद्धल
जीविताचें हासे फूल !

तुझ्या सहवासाविणें
कण्ठिलें एकाकी जिणें
अन्तीं मरण परन्तू
सेवूं एका ठायीं मी...तूं !

# नित्य वसन्त न लाभला !

किति दिमाख दाखवशील फुला !
कां अहम्पणें जग तुच्छ तुला ?

नाज़ुक नवती, रूप जवानी
कान्ति मनोहर परन्तु मानी
नश्वर सारा मामला !

पुनव-चान्दणें चार दिवस परि
आवस-रात पुन्हां अन्धारी
झुलतो काळाचा झुला !

आज तुला जग मस्तकिं चढविल
उद्यां तेंच पण पायीं तुडविल
हा दुनियेचा दाखला !

रङ्ग जगाचे दुरुनि बघावे
पण आपण त्यांत न रङ्गावें
मार्ग हिताचा हा भला !

काळवेळ अनुकूल तोंवरी
जीवितसार्थक कर कांहींतरि
नित्य वसन्त न लाभला !

## माळीण

[ जाति : सुन्दरयादव

माळिण तूं नारी !
तुझी ग चतुराई भारी
नवलाची न्यारीच किमया दाविलीस सारी !

कांहीं न मुळिं चीज
रुजविलें सहज प्रीतिबीज
जरि तूं नयनशरें करुनि हृत्प्रान्तच काबीज

हृदयीं फुलबाग
फुलवुनी लाविलीस आग !
नवशृङ्गार तुझा धगधगे अङ्गारच का ग ?

निष्ठुर छन्द पुरा ;
हार गुम्फुनि अरधा अपुरा
कळ्याफुलांचा तूं कुस्करुन कां केलास चुरा ?

कुठें इन्द्रबाग ?
उमगला सकल रागरङ्ग
धुन्द खुन्द हृदयास आली वेळेवर जाग !

स्वप्नें मधु विरलीं
भावरसगङ्गा ओसरली
इथुनि पुढें अपुली प्रीतिची देवघेव सरली !

*　　　*　　　*

करुनी कटु करणी
उगीच कां अजून मनधरणी ?
प्रेत सजीव पुन्हा करिल का अश्रूंची झरणी ?

पंखरण पुष्पांची
    रास कीं रचिली दगडांची
        सारखीच दोन्ही ! शान्तता अढळ समाधीची !

टाक मोहजाल
    जा, कुणा दुजावर खुशाल
        दावुं नको वायां मला हे चाळे चवचाल !

पुरें सोङ्ग ढोङ्ग !
    ओतुनी नजरेंतिल आग
        तुझें तूंच घेशी जाळुनी काळिज कां ? साङ्ग !

कशि ग रूपराणी,
    माळिणी, तूं वेड्यावाणी
        फुलवायास फुलें शिम्पिशी आधणाचें पाणी !

## लावण्यलक्ष्मी

[जाति : हरिभगिनी ; सुनीत

निसर्गसुन्दर नयनमनोहर रूपविभव नव युवतीचें
सहज लाजविल अप्सरेसही ; अमोल देणें देवाचें !

निरखुनि खुलत्या सौन्दर्याची रुचिर चारुता अमरगुणी
विविध कल्पनातरङ्ग रङ्गवि मदन्तरङ्गा गुङ्गवुनी

मूर्तच भासत अभिनव विकसित कमळकळीची कोमलता
लोचनलुब्धक लावण्याची कीं साक्षात् सुकुमार लता !

मोहकतेची मूस, मनोज्ञच सौंदर्याची सूर्यकला
स्फूर्तिदायिनी सुधास्यन्दिनी चित्तनन्दिनी चन्द्रकला !

चन्द्रवदन मत्सरें कलङ्कित ; वदनचन्द्र हा नित हंसरा
नेत्रतारका तेज उधळती, हसुनि हसविती चराचरा !

हलवी धागे रसिक हृदयिंचे मधुर छबी मधुमासाची
चेतोहारी नव नवलाई नवतीच्या उल्लासाची !

बघुनि अलौकिक रूपसम्पदा प्रश्न एक पण हा पडला
देव देत कां अशाश्वतपणा अशा दिव्य लावण्याला ?

## प्रणयकथा

[ वृत्त : पञ्चचामर

विनाशपाश सर्वथा, हताश जीव सम्भ्रमीं
विकारभार नावरे, रमे न चित्त संयमीं !

विमोह-डोहिं पोहती
विलासरङ्गि नाहती
प्रसन्न दोन जीव हे अभिन्न भावसङ्गमीं !

विरोध-सङ्कटीं महा
दुणावतोच वेग हा
प्रवाह इष्ट ना वळे, उगाच कष्टती श्रमीं !

मनीं उदण्ड हांव ती
पुढें पुढेंच धांवती
खुळेच आन्धळे ! टळे न घात दुक्खकर्दमीं !

फुटून जाति बापुडे
क्षणांत रङ्ग-बुडबुडे
तरङ्ग भङ्गती ; न जीवनींहि शाश्वती हमी !

सुखांत अल्प रङ्गणें
लगेच दूर पाङ्गणें
मनोरथींच टाङ्गणें मना ; न यातना कमी !

विषादगीत गुङ्गणें
कुणी कुणास साङ्गणें
मनोव्यथा-कथा अशी प्रचीतिपूर्ण नेहमीं !

## जोगीण

[ राग पिलू : मिश्र ; ताल : केरवा

अनुक्रम ९८८३
विभाग २१.३८
क्रमांक ९२८
नों. दि. ९५२

तुझ्या दारिं आलें होतें
भिकारीण राया,
साद घातली आशेनें
जीव तोडुनीयां !

मूक हांक ह्या हृदयाची
ऐकलीस नाहीं
दाविलीस बेपर्वाई
दार झांकुनीयां !

अपेक्षिलें तुजपासुनि तें
मिळालेंच नाहीं
राहिलें न माझें तेंही
आपुलें म्हणाया !

दूर परी गेल्यावर मी
सूर ओळखोनी
साथ मला द्यायाला कां
धावलास वायां ?

जीवनास जोगिण मुकली
दीन ही तृषार्ता
चालली अतां जगताची
सुखें आग प्याया !

## मीच वेडी नाचरी !

[वृत्त : देवप्रिया ; गझल

फार होतें प्रेम त्याचें
नेकिचें माझ्यावरी
जाणिलें तें अन्तरीं मी
मानिलें नाहीं परी !

गर्व रूपाचा मला अन्
छानछोकीची रुची
सद्गुणी साधा सिधा तो
वृत्ति सङ्कोची तरी !

व्यक्त केली नाहिं त्यानें
प्रीत भोळी भाबडी
मात्र मीं गे पाहिली ती
नित्य तन्नेत्रान्तरीं !

ओढणी लागे जिवाला
दूर तो गेल्यावरी
वञ्चिलें वायां स्वतःला
मीच वेडी नाचरी !

## दे मोहास रजा !

प्रेम आपुलें विसरुन जा
दे सखये, मोहास रजा !

अचल तुझी अति उत्कट प्रीती
आशा, अभिलाषा उज्ज्वल ती
दुराशेंत परि काय मजा ?

प्रकाश दिपवी तुला ; पण पहा
स्वतःसि जाळुनि घेत दीप हा !
कां भुलसी वरल्या साजा ?

मी दुर्दैवी ! माझ्या हातीं
हिऱ्यांचेहि कोळसेच होती
जिणें होय मज घोर सजा !

हृदयदान मज करिसी तूं पण
परिस्थितीचे गुलाम आपण
त्यागाविण नच मार्ग दुजा !

कलिके, रम नववैभवीं सुखें
दुरून पाहिन मोदकौतुकें
अखण्ड भाग्यविकास तुझा !

## मी कसें तुझ्यावर प्रेम करूं ?

मी कसें तुझ्यावर प्रेम करूं ?
कां मोहजाल फसवें पसरूं ?

उजाड झाला बगिचा सारा
झडून गेला पार फुलोरा
उरला कांट्यांचाच पसारा
कळ्यांफुलांना नुरला थारा
गेन्द गुलाबी कुठले आणूं ?
कसा तुझा सत्कार करूं ?

नाशुनि आकाङ्क्षा अभिलाषा
जिवास बिलगत निशा निराशा
भरल्या नयनीं तुफान नाचे
तरळति कण कण भग्न मनाचे
तुजसाठीं मृत जीवनांत ह्या
नव सञ्जीवन कुठुनि भरूं ?

गीत मनींचें मनींच विरलें
स्मित अधरींचें अधरीं जिरलें
कुन्द जहरली रात्र काजळी
तुझें आगमन भलत्या वेळीं !
जहराचें अमृत करण्याची
खुळी हांव मी केंवि धरूं ?

मी कसें तुझ्यावर प्रेम करूं ?

## आस

[ राग : माण्ड–पहाडी ; ताल : केरवा

छेडुनीयां हृदयवीणा
जादुगारा, दूर जाशी !
दान माझें द्यायचें तें
राहिलें माझ्याचपाशीं !

साद जीवा घातली तूं
दाद नाहीं मज परन्तू ;
स्वप्न सारें भङ्गलें तें
जागृती वैरीण खाशी !

हांक हृदयाची तुझी ती
मज उशीरां उमजली ;
विकल अन्तर हें निरन्तर
गुन्तलें तव मोहपाशीं !

कुढतसें मनिं मी अभागी
दूर लोटुनि सौख्यराशी ;
अजुन तूं परतून येशिल
आस ही बिलगे उराशीं !

कां उदारा, दूर जाशी ?

## कलाङ्कित राजसा !

[ जाति : घनराई

असशि कलङ्कित तसा
शशाङ्का, कलाङ्कितहि राजसा !

जगिं नसे खला त्या तुला
ग्रासितो राहु तो तुला
धरिं दांत; घातहेतुला
पुरवि; तरि दन्तव्रण हा असा !

तव वदनिं बघुनि लाञ्छना
ह्या अशा विविध कल्पना
सुचतात कवीच्या मना
मोहिशी रसिकांच्या मानसा !

कीं अङ्गारा दृष्टिचा
खुलतसे तुझ्या भाळिंचा ?
जननिचा विश्वदेविचा
उमटला वात्सल्याचा ठसा !

तव गुणां गालबोट कीं
तुज कलङ्क शोभे मुखीं
जग दङ्ग तुझ्या कौतुकीं
सख्या, तूं कलावन्त–रत्नसा !

कीं रजनी ती विरहिणी
दे आलिङ्गन धावुनी ?
तिज करपाशीं बान्धुनी
चुम्बिशी कुरवाळुन का असा ?

तूं शशाङ्का मनोहरा,
जगिं भाग्यवन्त मोहरा
जरि कलङ्क तुज तो जरा
तुझी प्रीतिची तृप्त लालसा !

निज कलागुणांचा पहा
कीं अहङ्कारमद महा
बिम्बला तमोभाव हा ?
मनाचा मुख निर्मळ आरसा !

ती प्रेमळ सुन्दर भली
सहचरी गुणी लाभली
चन्द्रिका सती शोभली
धरी त्वत्प्रीतिछन्द मधुरसा !

असशि कलङ्कित जसा
तसा तूं कलाङ्कितहि राजसा !

ऊठ ऊठ, चल झणिं ये सखये, हा धर माझा हात
नव सुन्दर कौमुदीमहोत्सव फिरूं बनांत पहात !

दुग्धधवल बघ ज्योत्स्ना विमले,
स्वप्नसृष्टि तेजोमय उमले
सकल विश्व सुखरङ्गीं रमले
दिव्य सुधागङ्गेंत हिमाङ्गी वसुधा पहा नहात !

विसरुनि अवघ्या आधि व्याधी
क्रूर जगांतिल बन्ध उपाधी
जडवूं जीवा प्रीतिसमाधी
जाऊं चन्द्रिकार्णविं आनन्दें स्वच्छन्देंच वहात !

भयसङ्कोचें बद्ध खोल तीं
मनें मोकळीं गूढ खोलती
सुखासुखाचें गूज बोलती
प्रीतिनाद पडसाद निरन्तर घुमत जगांत रहात !

## हळु बोल ग मैना ! [ राग : पहाडीमिश्र ; ताल : केरवा

हळु बोल ग मैना !
झोपला ग खेळुन दमला
माझा तान्हा !

नको हम्बरूं कपिलामाई
पाडस माझें करि अङ्गाई
मने, करुं नको लुडबुड, कुरकुर
पुरे तुझी रे मोत्या, गुरगुर

किति साङ्गुं तरी बाई कुणां कुणां ?
निजला चिमणा राजस राणा
माझा कान्हा !

बोलुं नका कुणि गुलगुल गुलगुल
निवान्त निजला माझा बुलबुल
कळ्याफुलांची थाम्बत कुजबुज
चन्द्र-चान्दण्यांचेंही हितगुज

बाराहि शीळ मुळिं वाजविना
मी पण सजणी, आवरला बघ
फुटला पान्हा !

हळु बोल ग मैना !

## पिञ्जऱ्यांतील पोपटास ! [ जाति : लीलारति

पोपटा, मिरविशी डौल कशाला वृथा ?
ही तुझी प्रतिष्ठा पोकळ रे सर्वथा !

ना प्रज्ञा, प्रतिभा, स्वयम्प्रकाश न मुळीं
तव परप्रत्ययी बुद्धि आन्धळी खुळी
श्रीमन्ती उसनी ऐट पाङ्गळी लुळी
धिक् धिक् परवशता ! धिक् तव जीवितकथा !

जनमनोरञ्जना मुख·अपुलें खोलसी
पढविले ठराविक बोल तेच बोलसी
पाण्डित्यप्रदर्शनिं मतिमन्दा, डोलसी
परि विदूषकापरि मोल तुझें तत्त्वतां !

इच्छेस धन्याच्या देह सदा वाहुनी
विकलीस बुद्धिही गमते तुज पाहुनी
मन मरून गेलें पिञ्जऱ्यांत राहुनी ;
ना स्वाभिमान तुज, पाषाणच तूं जिता !

पञ्जरिं चर्पटपञ्जरी नित्य बरळणें
दिनरात धन्याची मर्जी साम्भाळणें
नव खाद्यपेय-सुखविलासांस भाळणें
निस्सत्व जिण्यांतच सदा तुला धन्यता !
स्वातन्त्र्यतृषा नच ; धिक् ही स्वार्थान्धता !

# तारकेस !

हसऱ्या तारे, हास खदखदां
किरण हासरे फेक एकदां
हास्य उधळुनी सदा सर्वदा विश्व हसविशी तूं सुखदा
हसवशील गे मला कदा ?

आयुष्याच्या घनान्धकारीं
हास्यरङ्गरसिं रङ्गविणारी
प्रेमतारका एक मिळे तरि उदासवाणा जीव पिसा
हसेल खास अखण्ड असा !

माझ्यासम कितिकांना होई
भयाण दुनिया दहनभूमि ही
निशिदिनिं कुढल्या कढल्या हृदयीं रचिलीं आशांचीं सरणें
एकच हो जगणें मरणें !

निज हास्याची अशिच निरन्तर
मधुर जादु परि उधळशील तर
खुलेल जग नन्दनवन सुन्दर; सुधाच होइल जहराची
फुलेंच बनतिल कांट्यांचीं !

नको पाहणें मागें वळुनी
हृदयीं आशा पुन्हा कवळुनी
ध्येयमार्ग घेतों चोखाळुनि; जीवितपथ मम उजळित हा
सतत तारके, हसत रहा !

## ढेंकळास !

मातीच्या ढेंकळा,
बोल ना मातीच्या ढेंकळा !
तूं जड अथवा असे तुझ्यांतहि
चैतन्याची कळा ?

समान चेतनता, जडता वा
निस्सङ्गच तूं कुणि मुनि अथवा
निःस्पृह मनमोकळा ?

कळ्या, फुलें, तृण, नव धान्याङ्कुर
रूप, रङ्ग संसृतिचे सुन्दर
नाशिति जड अवकळा !

पण सरलें स्वप्नच मधु जीवन
स्मृति–विस्मृतिचें विमुक्त बन्धन
जिवा लागल्या कळा !

शून्याचें अवगुण्ठन सुटलें
अज्ञाताचे कण कण नटले
फुले जगाचा कळा !

## सत्याग्रही

निग्रही विरागी सत्याग्रही कर्मवीरा
मन्दिरासमान कारागार सत्वधीरा
प्रकटवीत आपत्तींची आग आत्मतेजा
तपस्याच राष्ट्राची ही दास्य-विलय-काजा !

मार्ग कण्टकांनीं भरला राष्ट्रवैभवाचा
मातृभूमिच्या कलिजांना भासला फुलांचा
मङ्गल स्वराज्याश्रम हो घोर बन्दिशाला
शुक्र-तेज, ध्रुवपद देई अतुलशा यशाला !

दास्य-शृङ्खला तोडाया मायभूमि बाही
लोहशृङ्खला जखडोनि मुदें घेउं पायीं
प्राणप्रतिष्ठाच तुरुङ्गीं जगत्क्रान्तिची ही
इथें कर्मयोगी भगवान् कृष्ण जन्म घेई !

देह बद्ध, परि जीवात्मा सञ्चरे स्वतन्त्र
घुमविती तुरुङ्गी भिन्ती तो स्वराज्यमन्त्र
उडी टाकुं स्वातन्त्र्याच्या रणीं झणीं; अन्तीं
विराजेल कण्ठीं शुभ ती विजय-वैजयन्ती !

# अहंमन्यास

[ जाति : पुष्पिता

‘ सर्वज्ञ महाज्ञानी मी ’ हा तुज कां गर्व फोल ?

फिरत्या ग्रहगोलांसङ्गें
अवकाशीं अगाध तरङ्गे
ह्या अनन्तकोटिब्रह्माण्डीं पृथ्वीचा सान गोल !

वसती ह्या पृथ्वीपाठीं
जीवांच्या अगणित कोटी
त्यांमधें एक तूं जन्तू ! अस्तित्वा काय मोल ?

कण विद्यामृतबिन्दूचा
लाभतां ज्ञानसिन्धूचा
तुज कूपमण्डुका, लागे पुरता का ठाव ? बोल !

अवतारच बृहस्पतीचे
मानससुत सरस्वतीचे
किति जगतीं ! त्या विबुधांशीं तूं अपुलें ज्ञान तोल !

जग तुच्छ क्षुद्र तुज भासे
हिणविशी सदा उपहासें
कां तुला आढ्यता मूढा ? सुटला साम्भाळ तोल !

विद्येसि विनय दे शोभा
मीपणाच मळवि यशोभा
सौजन्य दावि हृदयाचें ; माणुसकी जगीं अमोल !

## आकाशदिवा

शोभला भला भुलवी जीवा
हा दिवाळिचा आकाशदिवा !

अक्षय कान्ति अलौकिक खाशी
दीप तळपती किति आकाशीं
सात्विक स्पर्धा स्वर्गसुखाशीं
डोलत डौलें चढला वर वर
रङ्ग उजळला नवा नवा !

'संस्कृतिची उसळुं दे सुप्रभा
चारित्र्याची उज्वल शोभा
जगा दिपवुं दे रम्य यशोभा
उभारणें निज ,कर्तृत्त्वाचा
उञ्च उञ्च आकाशदिवा !'

हाच पुण्यसन्देश खरोखर
देतो जगताला चेतोहर
प्रतीक ध्येयाचेंच घरोघर
स्वर्भूसङ्गम हो हृदयङ्गम
तेजस्वी तळपला दुवा !
हा दिवाळिचा आकाशदिवा !

## दीपावली

ही सृष्टि आज धन्यता पावली
विलसली मङ्गल दीपावली !

नवोत्साह उल्हास ये भरा
हासत नाचत हर्षनिर्भरा
सुगुणसुन्दरा ही वसुन्धरा
गात मोदबिरुदावली !
विलसली मङ्गल दीपावली !

आकाशाङ्गणिं अनन्त अक्षय
दीपराग उसळे तेजोमय
गूढ विश्वदेवता-मनोदय
साङ्गाया सरसावली
विलसली मङ्गल दीपावली !

विवेक-तेजोवलयें भोंतीं
झगमगत्या त्यागाच्या ज्योती
नवयुगधर्मप्रभा अहो, ती
अणुरेणुंत सामावली
विलसली मङ्गल दीपावली !

मानवता–सेवा–प्रीतीचा
देशधर्मसंस्कृति-भक्तीचा
दीप उजळुं दे प्रगति–रतीचा
भारतभू आसावली
विलसली मङ्गल दीपावली !

## लक्ष्मीपूजन !

लक्ष्मीपूजन आज परन्तू
        हृदयसागरीं विचारलहरी उफाळती अनिवार !

पर्व अपूर्वच आज उगवलें
माङ्गल्याचें तेज उसळलें
उल्लासाचे रङ्ग उजळलें
        आनन्दीआनन्द कोन्दला दिगन्ति अपरम्पार !

थाटमाट नव शृङ्गाराचा
झगझगाट दीपज्योतींचा
लखलखाट नभिं नक्षत्रांचा
        प्रसन्नता सर्वत्र उधळतो रम्य विश्वसंसार !

गाजत साजत दिवाळी जरी
उत्साहें जन करिति साजरी
मी हतभागी दीनदरिद्री
        समान मज होळी नि दिवाळी ! जाळी हाच विचार !

विचारतन्द्रित उगाच गुङ्गुनि
रखडत फिरतां रस्त्यावरुनी
नयनां दिसलें सहजच दुरुनी
        एका धनिकाच्या प्रासादीं खुलें द्रव्यभाण्डार !

यथाविधी लक्ष्मीस पूजती
नव वर्षाचें पान उलटती
भाविक लक्ष्मीपुत्र हे किती !
        मङ्गल वाद्यें गर्जति, चाले उत्सव, जयजयकार !

भरलें तें ऐश्वर्य लोचनीं
तसाच दुर्मुखलेला परतुनि
दूर बैसलों नेत्र झांकुनी
मिटल्या नेत्रिंहि दिसूं लागला तो वैभवसम्भार !

त्या तेजस्वी धनराशींतुनि
ज्योतिर्मय देवता प्रकटुनी
दिपवुन सोडी अवघी अवनी
सगुणरूप लक्ष्मीच ! मनोमन पटला साक्षात्कार !

'कुठें चाललिस आई ! आई !
वत्सलता कां लोपुन जाई ?
लोटुं नको लेंकरें दूर हीं
तुझा जिव्हाळा दुरावतां जगिं कोणाचा आधार ?'

मी हें पुसतांक्षणीं थाम्बुनी
देवी वदली विषण्ण वदनीं
'माझीं मङ्गल रूपें भुवनीं
तुडवुनि चरणीं स्वार्थान्धांनीं केलें मज बेजार !

'हिरेमाणिकें सोनें मोती
धनें अशाश्वत मम छाया ती
तिलाच लक्ष्मी लोक समजती
भुलवी नटवी माया ; जग हें वेड्यांचा बाजार !

'तव बन्धूंची करणी निरखुनि
पहा एकदां अन्तर्लोचनिं
तुझें तुला मग उमजेलच मनिं
निर्वासित मीं अभागिणी कां फिरते दारोदार ?'

‘क्षमस्व ! मायापांखर घाली
करुणा करि....’ वदलों बद्धाञ्जलि,
ती परि अन्तर्धान पावली
स्थिरली माझी दृष्टि क्षणभर गगनीं शून्याकार !

रात्र रङ्गली जगास कवळुनि
आजुबाजुला बघतां वळुनी
घनान्धकारच ये आढळुनी
घोरत पडला समाज अवघा रूढीचा लाचार !

जीव गाञ्जले गरीब कष्टी
कोर मिळाया पोटासाठीं
मजूर राबति अर्ध्या पोटीं
पुरे हवापाणीहि मिळे ना ; सारा हाहाकार !

सधनांचा दर घांस तुपाशीं
कर्दा परि सावकार-पाशीं
शेत पिकवुनी मरत उपाशी
दैन्यदुक्खदारिद्र्य सरे ना, शिरिं कर्जाचा भार !

* * *

सस्यश्यामला भारतभूमी
शील, सत्व, विद्या, भवधामीं
लक्ष्मीचीं हीं रूपें नामी
स्त्री तर साक्षात् लक्ष्मी ! मङ्गल प्रभूचाच अवतार !

विविध स्वरूपें नटली लक्ष्मी
मर्म ओळखुनि अन्तर्यामीं
जीवित वेंचावें सत्कर्मीं
मानवता-पूजनीं यथार्थच लक्ष्मीचा सत्कार !

## मकरसङ्क्रान्त

[ जाति : कोकिळ

क्र. क. ८०१

आली अहा मकरसङ्क्रान्त !

रूढि साजरी सङ्क्रान्तीची
देवघेव अवघी शब्दांची
स्नेहादरपूर्ति कीं सदाची
उरली ' तिळगुळ घ्या मधु बोला ' ह्याच महामन्त्रांत !

तत्त्वमण्यांची तेजोमाला
दडे धर्मसिन्धुच्या तळाला
सण–सोहाळे शङ्ख शिम्पला
मिरवित डौलें समाज रमला बहिरङ्गी भपक्यांत !

नित्य खवळत्या संसृतिसागरिं
खलमकरांची दाटी भारी
साध्या भोळ्या सज्जनांवरी
कितिक कुटिलमति अधम जनांची कोसळते सङ्क्रान्त !

नक्राश्रूंनीं न्हाती डोळे
अन्तर काळें, वरी निराळे
उपचारांचे उथळ उमाळे
मिळे दाम्भिकां मानमान्यता व्यवहारी जगतांत !

खरा जिव्हाळा होत वावडा
प्रिय तो शिष्टाचार तेवढा
गनिमी कावा बोलघेवडा
खुल्या दिलाचे बोल दुर्मिळच जग-कोलाहलांत !

स्पष्ट सत्य बोले तो वैरी
दुष्ट तरि सखा तोण्डपुजारी
भुलवी अभिनयकला–चातुरी
जलाल नागिण जीभ गोड पण अन्तीं करिते घात !

लोभी वृत्ति, अहन्ता चित्तीं
वटवट वरपाङ्गी वेदान्ती
स्वार्थसाधु सम्भावित रीतीं
झिङ्गतात सत्ता-श्रीमन्ती-कीर्तीच्या कैफांत !

अशी विलक्षण दुनियादारी
तिखट तळपती सुरी दुधारी
दुष्कृतिनें करि वार जिव्हारीं
वरवरला मधु बोल शान्तवि न अन्तरिंचा आकान्त !

*          *          *

‘जीव-जिव्हाळा तिळ तिळ तोडुनि
प्रेमशर्करापाकीं घोळुनि
विमल भावनारङ्ग मिसळुनी
स्निग्ध रुचिर खुलवावा हलवा भावुक शुद्ध मनांत !

‘जिवाजिवाचीं भावबन्धनें
दृढतम जुगलीं प्रेमरज्जुनें
स्वर्ण सङ्क्रमण-दिन तो गणणें
समता ममता वरा....’ साङ्गते मधुमङ्गल सङ्क्रान्त !

## चल नेटानें पुढें !

[ जाति : केशवकरणी

भ्रान्त पडे ; भलत्या चिन्तेनें जीव तुझा कां कुढे ?
गड्या, तूं चल नेटानें पुढें !
मार्ग दिसेना, तिमिर दाटला, जरी समोरच खडें
पदोपदिं नवें नवें सांकडें
उत्साहें चल ; पहा उद्यांच्या उजळ उगवतीकडे
वितळतिल काळोखांचे कडे !
कां धीर उडे, मन दुक्खकर्दमीं बुडे ?
जें झालें गेलें मरुं दे तें बापुडें
बघुं नको वळोनी, चाल झपाझप पुढें !
भविष्य उज्ज्वल, विशाल जीवन रङ्गलेंच केवढें !
वीर जीवनरणिं शौर्यें लढे !

दणगट मनगट, जोम मनीं तरि जिङ्कुनि अवघी धरा
हात हा जगन्नाथ हो खरा
ध्येयपथावर परिस्थितीशीं झुञ्ज सदा खेळणें
दैव जणुं मर्दाचें खेळणें !
आपण अपुला शत्रुमित्र जगिं, करणी तैशीं फळें !
प्रयत्नें परमेश्वरही मिळे !
अतिसुन्दर मानव-जीवन बहुमोल हें
सुखविलासामृतें भरला पेला नव्हें
निज कर्तृत्त्वानें भरायचें माप हें ;
क्षेत्रिं आंखल्या अखण्ड करणें कष्टांची पेरणी
सुगीचा नको विचारच मनीं !

## वेडा !

[ जाति : बालानन्द

खुशाल मज वेडा ठरवा
मला न लव चिन्ता, पर्वा !
मी प्रीतीचा पोशिन्दा
नसे कुणाचा कधिं मिन्धा

जग वेड्यांचा बाजार
मीहि एक वेडा पीर !
स्वच्छन्दी भ्रमरावाणी
गातों हृदयाचीं गाणीं

खेळगडी, पांखरें, झरे
चन्द्र, सूर्य, तारे सारे
एक तालसूरहि माझा
आत्मसुखी मी रसराजा

बन्धु सिन्धु, गिरी, तरुवृन्द
भक्तिछन्द करि मन धुन्द
बनविन जङ्गल जगताचें
मङ्गल नन्दनवन साचें

निसर्ग माझा गुरुदेव
दिव्य ज्ञानाची ठेव
वेडा म्हणतां तर वेडा
पण माझा रस्ता सोडा !

माझ्यापुरतें मीच भलें
स्वतन्त्र नव जग निर्मियलें
सुज्ञ शहाणे म्हणवीतां
स्वतांस सम्भावित गणतां

तुटले जगताचे बन्ध
सुटले अवघे निर्बन्ध
कां मग उगिच मला छळतां
मजसङ्गें वेडे बनतां ?

[ जाति : चन्द्रकान्त ; सुनीत

घनतिमिराचा टाकुनि बुरखा करि लाडिक लीला
दावि कान्ति हसरी नव बाला दिव्य चारुशीला
सुन्दर काञ्चन-विलास-मन्दिर सोडुनि लगबग तें
पूर्वदिशेच्या गवाक्षांतुनी डोकावुनि बघते
आळवीत भूपाळी मञ्जुळ विहङ्गमांसङ्गें
उषा उगवली ! नवरसरङ्गें विश्वगोल रङ्गे !

झळझळती जळवन्ती माया भरल्या दरियाची
डगमगत्या लहरीवर नाचे नव्या नवाईची
नाचनाचरी ही हिमवन्ती चमचमते इकडे
साज साजऱ्या फुलवन्तीचा घमघमतो तिकडे
नव स्फूर्तितेजाचें खेळें चलाचलीं वारें
अणुरेणुंत चैतन्य उसळलें मङ्गलमय सारें !

उषा प्रीतिकर्तव्यरतीची हृद्गगनीं फुलली
सुचिरयौवना रुचिर तीच का अमरपदीं खुलली ?

अनुक्रम ९.५.५.३
विभाग २१ : ३१०
क्रमांक १२८
नों. दि. १९११

## रजनी

शान्त शान्त रजनी
भासते पुण्यशील योगिनी !

धवलवसनधारिणी शुभाङ्गी
विमल चन्द्रिकेचें सितरङ्गी
भस्म चर्चिते ही सर्वाङ्गीं
थोर ब्रह्मवादिनी !

पूर्ण चन्द्रबिम्बाचा भालीं
मङ्गल चन्दन–तिलकच ल्याली
गळां तारकामाला घाली
वियोगिनी विरहिणी !

अखण्ड धुण्डित सखा दिवाकर
हिण्डत जणुं नवखण्ड धरेवर
प्रियकरास भेटाया आतुर
रमणी हतभागिनी !

## वर वर हसतों !

[ जाति : शुभवदना

वर वर हसतों अन्तरिं पेटलों तरीही
न कळे मज सम्पणार कधिं कुचम्बणा ही !

उमले कलिका हसरी
मधु सुगन्ध उधळी जरि
तिज खल कीटक जिव्हारिं
दंश करिति पाही !

परदुक्खें शीतल अति
दाविण्या सहानुभूति
सवड आणि आवड ती
ना जगा कदाही !

नाचत सागर-लहरी
धवल फेन-हास्य वरी
वडवानल दारुण परी
हृदय सतत दाही !

आपण हसतां हसतें
रडतां परि ना रडतें
जग उभे स्वतांपुरतें
स्वार्थभार वाही !

हास्यकान्तिनें दिगन्त
फुलवि चन्द्र शान्त दान्त
भोगितो कळा अनन्त
जग जाणत नाहीं !

बाह्य जगत्, अन्तर्मन
कोडीं हीं कठिण दोन
नित चिन्तनिं गुन्तुनि मन
उकलण्यास पाही !

आंत झुरे ; परि वरि तें
मोदवृत्ति मन वरितें
फसवि जगा सुनें रितें
फसतसे स्वतांही !

## नाहिं बोलणार !

हासल्याशिवाय तूं
        नाहिं हासणार मी
बोलल्याशिवाय तूं
        नाहिं बोलणार मी !

गाल हासती तुझे
        नेत्र बोलती तुझे
नजर लाघवी तुझी
        देत प्रीतिची हमी !

राजसा, ह्या फसवा
        कां अबोला, रुसवा ?
उगिच का सख्या, मला
        गाञ्जतोस नेहमीं ?

जीवभाव आपुला
        तूं नि मी गुन्तविला
साभिलाष निर्मिला
        प्रीतिगोफ रेशमी !

प्रीतिगोफ गुम्फला
        जरी पुन्हां उकलला
तरि मानी मनाचा
        पीळ होइ ना कमी !

## निर्धार

चल रे सखया, मिळुनि जाऊं या
प्रवास अपुला पुरा करूं या !

खाण्डववन चौफेर पेटलें
जिवास जीवन जाळत सुटलें
ह्या वणवा उभयतां गिळूं या !

आयुष्याचा खेळत डाव
प्रखर लोकनिन्देचे घाव
तूं मी हासत उरिं झेलूं या !

दूर सारुनी सङ्कट-कांटे
आपण जाऊं अपुल्या वाटें
जीवनमधु उरला चाखूं या

## प्रीतिविना

प्रीतिविना जीव सुना
भङ्गली मनवीणा !
जाय रुसुनी जीवराणा
नाहिं ठाव ठिकाणा !

हसतिल सारे पुन्हां कधीं का
प्रणयाशेचे तारे ?
भेटतील का कधीं नदीचे
दोन अलग किनारे ?
जीवनभर आसवांनीं न्हाणें
प्रीतिचा का बाणा ?

कसा शोकसागरांत लोटुन
प्रियकर गेला दूर ?
गीत राहिलें अपुरें माझें
कण्ठीं विरले सूर !
साङ्ग सखे ग, गाऊं कशी मी
एकलीच तराणा ?

पूजेला मन्दिरांत जातां
भरून येतो ऊर !
रिता सुना पाहुन देव्हारा
उठे मनीं काहूर !
व्याकुळला हा जीव निरन्तर
झुरत केविलवाणा !

## तूं दिसल्यापासून

तूं दिसल्यापासून
स्वप्न नवीनच उमले,
बदले दुनिया उल्हासून !

नवें नवें जग सुन्दर हसलें
रुक्ष विफल जीवन रसरसलें
अमृत जणुं वरसून !

ओझरतां भिडतांच ह्या जरा
कुजबुजल्या बघ अपुल्या नजरा
बसल्या हृदयिं घुसून !

जीवभाव दरवळे मोहरुन
बघत मजकडे रोखुन चोरुन
तूं हसल्यापासून !

सरलें माझें मीपण साचें
मूर्ति तुझी नजरेमधिं नाचे
मनिं रात्रन्दिन ठसून !

क्षण क्षण युगसम तुजविण भासत
रितें सुनें सारखेंच जीवित
असून आणि नसून !

हुरहुरतें हें मन कां उन्मन
युगानुयुग शोधिलें तेंच पण
तव लोचनिं गवसून ?

## कां तळमळशी ?

[ जाति : मनमोहन

कां तळमळशी, हळहळशी वेडे ? कां झालिस व्याकूळ ?

भग्न वीणा छेडुनीयां
शिणविसी कां जीव वायां ?
मनपसन्त कैसे सूर निघावे संवादी मञ्जूळ ?

तुजसि यत्नाविण मिराशी
लाभल्या त्या रत्नराशी
परि तिरस्कार दाविला, त्यावरी तूं पिस्कारुनि चूळ !

आग मनिंची शान्त व्हावी
आसवांनीं कशि विझावी ?
बडवून ऊर शमतो न, वाढतो अधिक उरांतिल शूळ !

भक्तिचा दाटे उमाळा
गुम्फिशी कां पुष्पमाळा ?
बघ देवमूर्ति भङ्गली ; उभें तें शून्य रितें देऊळ !

दैव देई विभव हातीं
त्यावरी लोटून माती
शोधण्या गुप्त धन सुप्त अहीचें कां खणशी वारूळ ?

एकदां अन्दाज चुकला
घाव बसला, डाव हुकला
सर्वस्वा मुकला जीव जुगारी ; कां नन्तर चुळबूळ ?

दम्भ अन् पाण्डित्य, तोरा
मिरवुनी हृत्फलक कोरा
निस्सत्व तत्त्व बोधिलें तूंच ना 'प्रीती म्हणजे खूळ'?

पृथ्वीमोलाची परन्तू
धूळ प्रीती मानिली तूं
कां पटे अतां पण पायिं तुडवितां चढते मस्तकिं धूळ?

दिव्य मणिभाण्डार साचें
प्रीति म्हणजे दो दिसांचें
नच थिल्लर चिल्लर चलनी नाणें जें वाजे खुळखूळ!

बाण हातांतून सुटला
परतुनी येणार कुठला?
कां कुढशी, कढशी मनीं आतां तूं? सन्धि सरे अनुकूल!

## मरणा !

[ जाति : कोकिळा

अवचित मारुनि हांक
मरणा, कां मज दाविसि धाक ?

नश्वर देहावर तव सत्ता
सृष्टि चराचर तुझीच मत्ता
सदा अन्तका, जाणिव चित्ता ;
कां मग फोल दिमाख ?

भेकड दुबळा भ्याला तुज तो
धीर परन्तु न माझा खचतो
सत्य सनातन ! मर्त्य तनूची
अन्तीं माती, राख !

धनमानाची लव न वासना
निर्मळ मनिं तिळ भीतिवास ना
करस्पर्श तव शीत ; नेत्र मम
खुशाल कायम झांक !

कष्टुनि झुञ्जुनि जीव भागला
सत्व-तत्व-पालनीं जागला
प्रवाद, खलनिन्देचे घातक
घाव सोशिले लाख !

नेमुनि दिधलें मज भूवरलें
कार्य नियतिचें असेल सरलें
ध्याया प्रभुपदिं चिरविराम तरि
येशी दूत चलाख !

कर्मवीर गेले रण करुनी
तूंच तयांचें परि उद्धरुनी
सुयश-पथावर सरळ चालविशि
मनोरथांचें चाक !

तळमळता जनसेवेसाठीं
जीव धांवता ध्येयापाठीं
पुनर्जन्म जगीं घेत पेहरुनि
नव तनुचा पोशाख !

पुरे जगाचा दम्भ-उमाळा
नको कीर्तिच्या नकली माळा
निर्वाणींचा सखा तूंच ! कर
कण्ठीं स्नेहें टाक !

अनन्तांत घेउं दे भरारी
जीर्णज्वरजर्जर तनुपञ्जरिं
तडफडतें बघ प्राणपांखरूं
फडफडवी मऊ पांख !

वदति अज्ञ जन तुला अदय ; पण
नवजीवन तूं देसि अमरपण
प्रेमळ उदार उपकारक तूं
ब्रीद आपुलें राख !

कोठुनि कोठें प्रवास ? न कळे ;
स्वप्नच जीवित ! अहन्ता गळे
मुदें त्वदङ्कीं शिर टेकूं दे !
संसृति–चिन्ता खाक !



ज. ५

## उद्भ्रान्त

[ जाति : दोहा

भरास ये हा येथ पहा
जल्शाचा जल्लोष् !
स्वयंशिष्ट तूं कोण असा
फर्माविसि ' खामोष् ' ?

निस्सङ्गच रङ्गेल पुरा
धुन्द जीव बेहोष्
मूढ अरसिका, जा तिकडे
खुशाल कर आक्रोश् !

खट्याळ जग दाम्भिक अवघें
धरुं दे अखण्ड रोष्
खेद, खन्त, चिन्ता न मना
देवो कुणीहि दोष् !

या रे सारे शमन करा
तप्त जिवाचा शोष्
गाते गाणीं मधुराणी
करि जीवित–परिपोष् !

स्वैर विहरुं दे जीवात्मा
तनुचा फोडुनि कोष्
जिङ्काया नवखण्ड धरा
अङ्गीं उदण्ड जोष् !

भरभरुनी घ्या, भरभर प्या
पेले मनसन्तोष्
नकोच भय-सङ्कोच ; करा
तत्त्वाचा जयघोष् !

## मनें मिळालीं पण ....

मनांत माजे रण
विचित्र वर्तन केवि तुझें हें ?
उमगेना कारण !

गुजगोष्टी, भाषण
इतरांशीं ; पण माझ्याशीं कां
टाळसि सम्भाषण ?

गोड तुझें दर्शन
रोज घडतसे परी सुखाचा
जीवाला स्पर्श न !

जखमी झालें मन
घरीं तरी येतोस कशाला ?
डिवचायाला व्रण ?

सम्भावित लक्षण
जातांना कां हळुंच मजकडे
पाहुनि हससी क्षण ?

चोरुन टक लावुन
बघतें मी पण भिडतां नजरा
जातें भाम्बावुन !

चतुर दूत लोचन
हृद्गत साङ्गति शब्दाविण ते
मूक भाव उकलुन !

दैवयोग दारुण
हातावर पक्वान्नरास पण
हातिं न लाभे कण !

जिणें शून्य तुजविण
पिञ्ज्यांत बघ मानी मैना
झुरते रात्रन्दिन !

मनें मिळालीं पण
अजून कुठवर विरह कण्ठणें ?
दूर दूर आपण !

## लपण्डाव

[ जाति : मुद्रिका ]

कां करिशी अवहेलना हृदयमूर्तिची ?
कळुं देसि न थाङ्ग मनाचा
भलतीच तऱ्हा प्रीतिची !

कधिं उगाच धरुनी तूंच अबोला मशीं
मीच न बोलत, उलटा हा
मजवरी गुन्हा लादशी !

कोपुनी अकारण तीक्ष्ण वचें निन्दिशी
कोवळी कळी जीवाची
तूं शब्दशरें विन्धिशी !

कधिं प्रसन्नमुख, गम्भीर, उदासच कधीं
कधिं दाविशि ऐट मिजाशी
आपुल्याच लहरीमधीं !

कधिं हास्यविनोदीं रङ्गुनि मधु बोलसी
आनन्दें निज हृदयाचे
झट पडदे तूं खोलसी !

अनुभवुनी प्रेमळ वर्तन मनमोकळें
उत्साह मनांत दुणावे
प्रोत्साहन नयनीं कळे !

बोलाया धजतां प्रेमभरें धावुनी
क्षणिं परन्तु लोटसि मागें
नेत्रींच धाक दावुनी !

क्षण दृष्टिआड मी तरी करिशि चौकशी
चहुंकडे नजर मग हिण्डे
धुण्डाया मजला कशी !

तुजसमोर जर मी कधीं उभी राहिलें
तर अगदिंच बेपर्वाई
दाविसी जणुं न पाहिलें !

साधून सन्धि बोलणें मनीं योजिलें
तर मुळीं न दर्शन देसी
जरि घटका पळ मोजिलें !

वागून विचित्रच मन सम्भ्रमिं टाङ्गसी
आगळीक तरि ती माझी
कोणती मज न साङ्गसी !

लागती सारखे वेध तुझे मानसा
पिळवटे प्राण विरहानें
गारठे देह नसनसां !

स्नेहार्द्र नयनिं बिम्बुनी भाव बोलका
'मी तुझा नि तूं ग माझी'
हे बोल तुझे फोल का ?

मम रूपगुणां वानिसी जसा भाट कीं
लाघवी आर्जवी भाषा
मानुं का सर्व नाटकी ?

कां तुवां असा हा लपण्डाव माण्डला ?
तुज तोष मिळे परि माझा
व्याकुळे जीव कोण्डला !

चाळवणी आतां पुरे सख्या प्रेमळा,
सत्प्रीति–सुधा सिञ्चोनी
फुलव रे मनाचा मळा !

## बोल सुधेचा बोल !

[ जाति : अञ्जनी

बोल सुधेचा बोल
जिवलगे, हृदय आपुलें खोल !

मुग्ध मधुर मञ्जूळ साजरा
अति लाडिक लडिवाळ लाजरा
मृदु वीणाझङ्कारसा जरा
प्रीतिबोल तूं बोल साजणी
झुलुं दे मन-हिन्दोल !

जीवनसङ्गीतच झुळझुळलें
अननुभूत नव भाव उसळले
मनीं दिव्य चैतन्य उजळलें
तुझिया बोलें बघ मोहरलें
जीवित रुक्षच फोल !

जीवलता जोमें टवटवली
स्वप्नें सुखकारी घवघवलीं
जाइ जुई हृदयीं दरवळली
उषा प्रीतिची फुलवि अन्तरीं
बोल तुझा अनमोल !

प्रीति-क्षण तो पहिला झरला
बोल तरळ वाऱ्यावर विरला
स्मृतिसुगन्ध परि अखण्ड भरला
वञ्चक अभिनयकुशल कुटिल का
स्त्री-मन तरङ्गलोल ?

# द्या झणीं विषाचा पेला !

[ जाति : उद्धव

तत्त्वनिष्ठेसाठीं विषाचा पेला पिऊन मृत्यूच्या मांडीवर आनंदानें चिरनिद्रा घेणाऱ्या संतश्रेष्ठ सॉक्रेटीसच्या अंतःकरणांतून अंतकाळीं हेच उद्गार उसळले नसतील काय ?

कां विलम्ब आतां केला ?        द्या झणीं विषाचा पेला !

लागले स्फुराया ओठ        भरुं दे हा कांठोकांठ
जगताच्या सुरङ्गलहरी        नाचुं देत ह्यावरि जहरी
जीर्ण देह सोडायाला
जीवात्मा उत्सुक झाला
आकण्ठ पिवूं दे मजला        आणाच विषाचा पेला !

अणुरेणुंत अपरम्पार        चैतन्य भरे अनिवार
सत्त्वाचें शिरलें वारें        फत्तरही फुलले सारे
एकेक विषाचा बिन्दू
भासतो सुधेचा सिन्धू
मारुं दे मिठी मरणाला        द्या झणीं विषाचा पेला !

मानवी न्याय अजि देई        देहान्त-सजा मजला ही
परमात्मा परन्तु मजसी        ठरवील खास निर्दोषी
हा काय गुन्हाच अघोर
सुविचार-सम्पदा थोर
दिधली मी सकल जगाला        निर्माया क्रान्तियुगाला ?

जुल्मीच दडपशाहीचे कायदे झुगारुन तुमचे
जागुनी सत्यधर्माला मी पुजिलें मानवतेला
रुजविलें पीक सत्याचें
उजळेल पीक सौख्याचें
पथ दावित भावि पिढीला मीं उभा अजि अघाडीला !

मृत्यूचें भय कोणाला ? घातकी पातकी त्याला !
जो देशद्रोही झाला तो जिवन्त असुनी मेला !
प्रामाणिक जीवन जगलों
जनहितार्थ झिजलों ; मेलों !
हें समाधान चित्ताला द्या अतां विषाचा पेला !

अन्याय-आपदा-ज्वाला प्रकटवी आत्मतेजाला
स्वत्वास्तव मरतां आज सफल साच जीवित-काज
मरणांत अमरता नान्दे
मृत्यूच चिरञ्जीवन दे
अर्पितां प्राण देशाला वरि वीर अहेव यशाला !

नमवीन पदीं लवलाही प्रत्यक्ष कृतान्तालाही
हें ब्रीद सत्त्वधीरांचें हें ब्रीद कर्मवीरांचें
' जागुनी तुझ्या तत्त्वाला
हो सिद्ध वीर-मरणाला '
आदेश अन्तरीं घुमला सन्देश जगीं दुमदुमला !

साधाया जनकल्याण लाविलें पणाला प्राण
उपकार तुम्हांवर केले अपकारच अवघे ठरले
परि माझी श्रद्धा पूर्ण
जग नवें उद्यां उगवून
आदरील मम तत्त्वाला माझिया ज्ञानविभवाला

तो मार्गजात नरकाला जाहला खुला तुम्हांला
हा स्वर्ग सुखाचा सजला सन्मार्ग लाभला मजला
घ्या प्रणाम हा शेवटला
जगताचा पाशच तुटला
आनन्द-सोहळा नटला द्या झणीं विषाचा पेला !

## तोड ही माला !

[ वृत्त : देवप्रिया, गज़ल, सुनीत.

कां पुन्हां ही जीवघेणी मस्करीची चातुरी ?
लाघवी लीला न दावी मानभावी आसुरी !

सूर संवादी कधीं ना वाद-संवादीं जुळे
वाक्सुधेनें का विझे ती आग जी पेटे उरीं ?

खेळ आधीं माण्डला अन् मोडला तूं तत्त्वतां
पाङ्गलेलें चाङ्गलें ; राहे वियोगीं माधुरी !

मोल मातीचेंहि लोकीं ना मिळे नेकीस तें
मृत्तिका रेती ठरे ती भासली जी कस्तुरी !

प्रीत माझी ती इमानी ; जाणसी तूंही मनीं
काय पर्वा मानिली त्वां ती भली किंवा बुरी !

जीव हो घायाळ माझा, खन्त का त्याची तुला ?
सावजा दे मृत्यु घावें, ना इजा पावे सुरी !

कुस्करीलीं भावपुष्पें दूर दे फेकून तीं
भङ्गली प्रीति ! स्मृतींची तोड ही माला पुरी !

## विसरूं कशी ?

[ वृत्त : वियोगिनी

‘ पुरतें विसरून जा कसें
    अपुलें प्रेम पुरेंच ह्यापुढें !’
मज साङ्गसि केवि हें असें ?
    घडलें कारण काय बापुडें ?

‘ प्रणया विसरून जा ’ असें
    जगिं सोपें अगदींच साङ्गणें
परि भासत घोर मृत्युसें
    फसवोनी हृदयास वागणें !

नच काय तुझें तुला पटे ?
    अपुलें प्रेम मनीं दृढावलें ;
उगवे नव जों न रोपटें
    वद, कां तोडसि तूंच लावलें ?

जरि काळ करी बरा व्रण
    जणुं धन्वन्तरि तो विलक्षण
जळत्या हृदयीं उरे वण
    जहरी आठवणींत तो पण !

तुजला विसरूं कशी बरें ?
    मरणें त्याहुनि वाटतें बरें !
हृदयीं फुलला गुलाब रे !
    खुडशी तूं; मन होत घाबरें !

गिळणें प्रळयाग्नि दारुण
　　प्रणयाचे जगिं खेळ खेळणें !
वद, टाकुं कसें झुगारुन ?
　　सखया, प्रेम न पोरखेळणें !

तुजला भजलें परोपरी
　　परि तूं काळिज आज कांपलें
कटु बोल तुझे ; व्रणावरी
　　जणुं हें ओतिसि तेल तापलें !

विसरून खुशाल जा मला ;
　　पुरुषांची जगिं जात निष्ठुर
विसरेन कधीं न मी तुला
　　न विनाशी मम भाव भङ्गुर !

मनिं विव्हळ शोकसम्भ्रमें
　　ठरलें ह्या जगिं मी अभागिनी !
तव मानसपूजनीं रमे
　　परि रात्रन्दिन ही वियोगिनी !

## प्रीतिखुणा पटल्या ना ?

[ छन्द : देवीवर

प्रीतिखुणा पटल्या ना ?
मग किमर्थ हा किन्तू
खुळा हेका धरिशी तूं ?

अन्तरींची माझी प्रीत
पाल्हाळानें मीं वर्णावी ?
व्यर्थ बोलून दावावी ?

योजियेली वर्णमाला
अ पासून ज्ञ पर्यन्त
प्रेम वर्णाया साद्यन्त

तरी प्रज्ञावन्त सुज्ञ
प्रेमगानीं हतबुद्ध
ठरे अज्ञ अप्रबुद्ध !

खरी प्रीत शब्दातीत
कुणी आजवरी साङ्ग
वर्णिली ती यथासाङ्ग ?

अनुक्रम ७८८३
विभाग
क्र.
नों. दि.

## प्रश्नोपनिषद्

[ जाति : चन्द्रकान्त

सकल-सुगुण-सम्पन्न कोण सर्वज्ञच धीमन्त ?
पिढीजात वा अन्य उपायें जगिं जो श्रीमन्त !

महापाप कोणतें ठरतसें जगीं आजकाल ?
दीन हीन कुळिं जन्मुनि असणें गरीब कङ्गाल !

न्याय कोणता ठरे त्रिकालाबाधित जगतांत ?
बळी असे तो कान पिळी ! हा एकच विख्यात !

कसा प्रपञ्चीं परमार्थहि तो करि मनुजास सुखी ?
स्वार्थ साधणें हरप्रयत्नें सोडुनि माणुसकी !

थोर कुणाचें गणणें आत्मिक तेज, नीतिधैर्य ?
नेसूंचें शिरिं गुण्डळण्याचें ज्याचें नित शौर्य !

कोण जगीं व्यवहारी, सज्जन अन् सम्भावितही ?
ठकवुनि सकलां जो शठ नामानिराळाच राही !

धार्मिकता दाविणें, पाळणें धर्म कसा सत्य ?
करुनि टिळेमाळा बडबडणें वेदान्तच नित्य !

शान्तिसुखाची गुरुकिल्ली करि हातीं सांपडणें ?
त्यजुनी जनमनलज्जा भयही निस्सङ्गच बनणें !

## अनुभव-कोशांत !

[ जाति : चन्द्रकान्त

लाखों बेकायदा पाडणें खून ....'युद्ध करणें'
खरी सिद्धता नवीन युद्धाची तो 'तह' गणणें !

शिष्टपणें लोकांस फसवि तो 'मुत्सद्दी' जाणा
दाम्भिक शिष्टाचार पाळणें म्हणजे 'सभ्यपणा' !

साळसूद मुखवटा नित नवा तो 'शिष्टाचार'
जगास फसवुनि स्वार्थ साधणें म्हणजे 'व्यवहार' !

वृत्तपत्रिं गवगवा सचित्रच 'लौकिक' मानावा
मिरवी मीपण 'महापुरुष' तो सुज्ञच समजावा !

'चर्चा' म्हणजे विद्वानांची शाब्दिक लाथाळी
'वशिला' समजा बेकाराला द्रौपदिची थाळी !

'स्नेही जिवलग' जिवास करि जो अखण्ड बेजार
आजारच जीवावरचा तो 'ओङ्गळ शेजार' !

'लोक' तेच जे नाहक अपुली निन्दा करतात
'भाऊबन्द'....जे तुमचें खावुन तुम्हांस छळतात !

'प्रीती' म्हणजे मुखड्याचें आकर्षण, संमोह
'प्रपञ्च' लपलेल्या खडकांचा सुन्दरसा डोह !

## दावि मार्ग नीट !

[ जाति : मोहिनी

मुशाफरीचा ये देवा, पुरा पुरा वीट
पिश्यापरी एकच जडला छन्द तव अवीट !

तुडवितों अखण्ड; सरे ना रुक्ष वाळवण्ट
जीव तापला तान्हेला सुकुनि जाय कण्ठ
कुणा बाहुं ? पसरिल बाहू कोण समुत्कण्ठ ?
सारखीच वणवण करणें किती पायपीट ?

अस्तमान झाला; भंवतीं रात्र घन तरङ्गे
एकला मुशाफिर ! कुणि ना सोबतीहि सङ्गें
भार थोर शिरिं साहे ना; जीव हा दुभङ्गे
पुढें पडे न पाउल; दुबळा भ्याड मी, न धीट !

दिसे आसपास न कोठें सुविश्राम–धाम
उदासीन शून्य जिणें हें; आस म्हणे राम !
दयाघना, श्रान्त जिवा दे तूंच पदिं विराम
वञ्चितोचि काञ्चनमृगसा मोह–काळवीट !

तूंच सखा निर्वाणीचा; पुरविशी अभीष्ट
भ्रान्त मना न कळे कांहीं इष्ट अन् अनिष्ट
वाट चुके खाष्ट तुझें हें लेकरूं भ्रमिष्ट
तूंच धरोनीयां हातीं दावि मार्ग नीट !

## लोकमान्य गेले.... ?

[ जाति : उद्धव

ग्रहमाला तुटली सारी ध्रुवतारा प्रळयीं ढळला
चळकांप मेरुमान्दारीं मणि शेषशीर्षिंचा गळला
वैभवांत माध्यान्हींचा
निखळला सूर्य गगनींचा
अन्धारीं बुडलें अवघें शोकानें विश्व दुभङ्गे !

हा कौस्तुभमणि मोलाचा लाभला भला राष्ट्राला
वरिलें कीं परमेशानें अकराव्या अवताराला !
दिव्य तेज वीरश्रीचें
नवखण्ड धरित्री नाचे
मूर्तिमन्त नव चैतन्य ! कर्मवीर जगतीं धन्य !

ओजस्वी वाणी खुटली तरवार लेखणी तुटली
धीमन्त अलौकिक थोर झुञ्झार विभूति निमाली
लोकमान्य गेले ?.... नाहीं !
ही चलाचलाची ग्वाही
शुभ नाम वीर-तिलकाचें जगिं चिरञ्जीव हो साचें !

भेटले जीव-शिव आतां पाश पार्थिवाचा सुटला
ह्या अनन्तधामीं रमला हा अनन्तरूपें नटला !
पुण्यात्मा अमरपदाला
वरुनी अणुरेणुंत भरला
उधळतो स्फूर्तिचें तेज साधाया जनहितकाज !

पथ उजळा हिन्दसुतांनो, देशाच्या नव विभवाचा
सङ्घशक्तिनें निर्दाळा असुर दैन्यदारिद्र्याचा
चारित्र्य लोकमान्यांचें
आठवा वीर टिळकांचें
राष्ट्रोद्धरणीं निश्चिन्त अनुसरा महात्मा-पन्थ !

तळपुं दे अखण्ड तपस्या निज सत्व-तत्त्वनिष्ठेची
उसळूं दे उत्साहाची उकळी ताज्या रक्ताची
जनसेवाव्रत नित वरणें
जनहितार्थ जगणें मरणें
दे पाठ दिव्य मन्त्राचा द्रष्टाच लोकशाहीचा !

जन्मसिद्ध हक्कांसाठीं धैर्यानें सन्तत लढणें
पदिं पहाड आपत्तींचे तुडवीत यशोगिरि चढणें
तारण्या राष्ट्रधर्मासी
व्हा मुदें राष्ट्रसंन्यासी
सन्देश हाच टिळकांचा दुमदुमला जगिं नित्याचा !

## कलिकेचा जन्म फुका ! [ राग : काफीमिश्र ; ताल : दादरा

बघ लागली आग उरीं
    राग कशाला इतुका ?
विसरुन जा दिलदारा,
    आजवरच्या लाख चुका !

लोभ दाविला लटका ?
    लाविलास कां चटका ?
पाजिव रे प्रीतिसुधा
    कळवळला जीव भुका !

कळवूं कशि कितिदां मी
    अन्तरिंचा भाव मुका ?
रङ्ग तुझ्या प्रणयाचा
    काय सख्या, होय फिका ?

हृदयाचा रसराजा
    रुसला जरि भृङ्ग सखा
उमलुनि तरि लाभ काय ?
    कलिकेचा जन्म फुका !

## येणार तूं म्हणून !

मन नाचतें फुलून
येणार तूं म्हणून !

तुझ्याच आवडीचा
शिणगार-साज केला
बेभान जाहलें मन
तव चिन्तनीं रमून
येणार तूं म्हणून !

करिं धुन्द चान्दणें हें
उरिं हर्षपूर वाहे
निशिगन्ध, रातराणी
कशि गाति गन्धगान
येणार तूं म्हणून !

लोचन–निराञ्जनांत
पाजळुन जीवज्योत
दारीं उभी कधींची
तव स्वागता सजून
येणार तूं म्हणून !

कां येशि ना अजून ?

## वर्ण तूझा सांवळा !

[ वृत्त : देवप्रिया, गझल, सुनीत.

येत आकाशाङ्गणीं मेघावली ती श्यामला
नाचवी प्रेमी तृषार्ता चातकाला प्रेमला !

मञ्जु वाणी ती सुधेची, मोकळा गाता गळा
ओढणी लावी जिवाला नित्य काळी कोकिळा !

गोरटी राधा, तशी कुब्जाहि काळी गोकुळीं
आदरी प्रेमें समत्वें कृष्ण कान्हा सांवळा !

शील-विद्या-बुद्धिचें हें तेज नेत्रीं खेळतें
भावही निर्व्याज भोळा त्वन्मनींचा मोकळा !

पाहि अन्तर्लोचनें मोही मनःसौन्दर्य हें
सद्गुणांना आदरी मी त्वन्मना गङ्गाजळा !

वानुनी बाह्यस्वरूपा जाणणें ना सद्गुणां
फेकुनी मूर्ति प्रभूची पूजणें कीं देवळा !

भेद काळा आणि गोरा ना दिसे सत्प्रीतिला
चारुता रूपासि देई वर्ण तूझा सांवळा !

## निरोप

[ वृत्त : देवप्रिया, गझल, सुनीत.

'जा' असा घोटाळतो हा शब्द ह्या ओठावरी
बोलवेना तो परन्तू; चित्तवृत्ती बावरी !

ना कळे येणार केव्हां योग भेटीचा पुन्हा
ही वियोगाची सजा कां? प्रेम मानावा गुन्हा ?

नेत्रतारा हांसऱ्या तेजाळ ह्या आकर्षती
अन्तरङ्गा शान्तवाया अमृता कीं वर्षती !

कण्ठणें तूझ्याविणें का रुक्ष एकाकी जिणें ?
कण्ठ दाटे, भोंवतींचें विश्व हें वाटे सुनें !

का जिवाचें होत पाणी नेत्रमार्गें पाझरे ?
पूस डोळे, साजरे प्रेमामृताचे हे झरे !

प्रेमहेमाला वियोगाग्नींत कान्ती आगळी
जा गडे, सोल्लास दावी ती जरा गालीं खळी !

दूर तूं देशान्तरीं जाशी परी नाहीं क्षिती
भिन्न देहीं एक झालीं अन्तरें मीनाक्षि, तीं !

## वीरवन्दन !

[ वृत्त : आनन्दकन्द ; गझल

स्वातन्त्र्यसङ्गरीं जो प्राणावरी उदार
झुञ्झार थोर योद्धा तो वन्दितो त्रिवार !

देशासि तारणारा, मृत्यूसि मारणारा
त्रैलोक्य भारणारा, तो धन्य जादुगार !

आधार सज्जनांचा, वैरी परी खलांचा
तो कर्मवीर कैंचा मानील जीत-हार ?

पूजी सुपुत्र पाही माताच जन्मभू ही
भावें अमोल वाही स्वप्राणपुष्पहार !

चातुर्य-धैर्य-शीला सङ्ग्राम-शौर्य-लीला
लाभे चलाचलाला चैतन्य दुर्निवार !

स्फूर्ति-प्रकाशदायी सत्कीर्तिचन्द्रिका ही
व्यापून विश्व राही ; लोपे घनान्धकार !

हे चन्द्र, सूर्य, तारे, शाहीर, वीर सारे
गाती यशास ; साथी कालाब्धिही अपार !

## इथें आणि तिथें !

इथें भवचिन्ता, दारुण ताप
तिथें सुखशान्तिसुधाच उमाप !

इथें खल-मत्सर, निन्दा, द्वेष
तिथें समता, ममताच विशेष !

इथें शठ-तर्कट, वादविवाद
तिथें शुचिता, श्रद्धा, आल्हाद !

इथें कटु कण्टक पथिं अविराम
तिथें मृदु दूर्वादल अभिराम !

इथें घनतिमिर अघोर उदण्ड
तिथें शुभ तेज अनन्त अखण्ड !

इथें लघु जीवन मृत्युनिधान
तिथें सञ्जीवन, पुनरुत्थान !

इथें नित कोलाहल, सङ्ग्राम
तिथें चिर विश्रान्तीचें धाम !

# देवा ! [ अभङ्ग

देवा, दयाघन म्हणविशी मात्र
मिटशी कां नेत्र करुणेचा ?

एकाचें मरण, दुजाचें जीवन
न्याय विलक्षण विपरीत !

एकाला विष तें दुजातें अमृत
भली रीतनीत दुनियेची !

कुणी साण्डी रक्त प्राणान्त माण्डोनी
त्याचा टिळा कुणी लावी भाळीं !

रङ्कांच्या रक्तानें फुलला बगीचा
निर्दय रावांच्या वैभवाचा !

अनीति-अधर्म घोर अनाचार
पापाचा सञ्चार ठायीं ठायीं !

तूं का विसरशी तुझा ब्रीदबोल ?
कधीं घेशी बोल, अवतार ?

## सन्थ जरा वहा !

विझवुं नको पणती जीवाची
सन्थ जरा वहा पवना रे !

मिणमिणती इवलीशी पणती
मम हृदयाला उजळत पण ती
नभाङ्गणींचे झगमगणारे
रुचति न दीपक सारे
सन्थ जरा वहा पवना रे !

थरथरती बघ नवथर ज्योती
प्रकाश कोमल साण्डत भोंतीं
स्नेहानें नखशिखान्त न्हाली
नटली नव शृङ्गारें
सन्थ जरा वहा पवना रे !

देव्हाऱ्यांत न देव तरीही
नन्दादीपच तेवत राही
तेज भरे अन्तरीं जीवना
सञ्जीवन देणारें
सन्थ जरा वहा पवना रे !

# कृतघ्नता !

[ जाति : साकी

मानवनिर्मित जगतिं कायदे–
कानू अनेक झाले
अम्मलबजावणीही त्यांची
न्यायालयांत चाले !

अपराधांचें छोटें मोठें
दिसेल जसें स्वरूप
तसें त्यास तत्काळ कायदा
शासन करि अनुरूप !

परि वाटे न्यायाचें मोठें
अवडम्बर हें खोटें
एका अघोर अपराधाला
शासन दिसे न कोठें !

न्यायशास्त्र अति सूक्ष्म परन्तू
त्यांत उणेपण दिसतें
कृतघ्नता हा भयङ्कर गुन्हा !
शासन काय तयातें ?

## हृदय राहिलें मुकें ! [ राग : कालङ्गडा ; ताल : दादरा

व्याकुळें खुळें मुकें
वाहिलें तुला परन्तु
हृदय राहिलें मुकें !

प्रीतिला तुझ्या अपात्र
आधिं जाणलें न मात्र
जीव झुरे दिवसरात्र
आन्धळी उडी चुके !

खेळ माण्डला उगाच
तारेवरलाच नाच
माझा अविचार साच
तोल खालतीं झुके !

तूं जगीं स्वयम्प्रकाश
हिरा कोहिनूर खास
गारगोटि मी ; हताश
कण्ठितें जिणें फुकें !

तुझ्या रूपचिन्तनांत
गुन्तुनि सन्तत मनांत
प्रीत धांवते नितान्त
भोंवतीं जरी धुकें !

कीर्तिविभव तव अहेव
एकमेव तूंच देव
पुजितें तुज मनिं सदैव
साभिमान कौतुकें !

## तो देव माझा !

[ जाति : दिव्याङ्गना

अनुक्रम ७.८
विभाग
क्रमांक
नों. दि.

तो देव माझा
तो हृदय-राजा !

ध्येयार्थ बेहोष
देवो कुणी दोष
जनिं तोष कीं रोष
धरि ना मुलाजा !

झिडकारित कदा न
जन पतित नादान
देतो अभयदान
वदतो न ' जा....जा ! '

तत्त्वें ठरावीक
लाथाडतो ठीक
जो घालिना भीक
भोन्दू समाजा !

संसार निस्स्वार्थ
करि सार्थ परमार्थ
वरितो जनहितार्थ
उल्हास ताजा !

कुणि फसुनि मोहांत
बुडतां प्रवाहांत
देतो तया हात
उद्धारकाजा !

निष्काम सत्कर्म
जाणे खरें मर्म
सजला दयाधर्म
परसौख्यसाजा !

तो देव माझा
तो हृदय-राजा !

## मार्ग चाल एकला !

मार्ग चाल एकला !
मुशाफिर, मार्ग चाल एकला !

साद जिवाची तुझी ऐकुनी
'ओ' ही नाहीं दिली जरि कुणीं
साङ्ग आपुलें हृदय उकलुनी
गुज मनिंचें सकलां !
मुशाफिर, मार्ग चाल एकला !

जग न तुजकडे ढुङ्कुन पाही
पाय रक्तबम्बाळ तरीही
वाट बिकट अति कांटेरी ही
तुडवित चल एकला !
मुशाफिर, मार्ग चाल एकला !

बादळांत अन्धेऱ्या रातीं
प्रकाश जरि कुणि तुज न दाविती
तूं दिसतांक्षणिं दार लाविती
तरि अपुला आंखला
मुशाफिर, मार्ग चाल एकला !

उरीं प्रखर वज्रानल कवळुन
निज अस्थींची ज्योत पाजळुन
ध्येयमार्ग घे अपुला उजळुन
जळून जा एकला !
मुशाफिर, मार्ग चाल एकला !

## तुज आलों शरण ! [ जाति : पुष्पिता

मी कृतघ्न पुरता देवा !
मज माझी गमे लाज !

सुखवैभविं रमतां थोर
विसरतों तुला बिनघोर
परि भजतों सङ्कटकालीं
जइं दुसरा ना इलाज !

जगिं मिळतां मान, प्रतिष्ठा
लव नुरे तुझ्यावर निष्ठा
सञ्चरे अहन्ता अङ्गीं ;
कर्तृत्वाचाच माज !

मिरवितों यत्नवादाची
प्रौढी निज बुद्धिबलाची
मज कर्तबगार गणोनी
वाखाणी जनसमाज !

मी श्रेय-धनी यश मिळतां
परि अपेश पदरीं पडतां
लादितों दोष तव माथां ;
बेमानी स्वार्थकाज !

कर्ता करवीता असशी
परि मला श्रेय तूं देसी
औदार्य थोर तव साजे ;
तुज आलों शरण आज !

देहाची समई
त्यांत तेल तूप
रक्ताचें अमूप
ओसण्डते !

जिवाला पिञ्जोनी
निवटला स्वार्थ
हाडांच्या यथार्थ
काडवाती !

अहङ्कार चित्तीं
कर्तृत्त्व वाही जें
झाडली पाहिजे
काजळी ती !

कर्तव्यनिष्ठेचा
उज्ज्वल प्रकाश
ध्येयमार्ग खास
उजळील !

तेवूं दे अखण्ड
शान्त पावित्र्याचा
थोर चारित्र्याचा
नन्दादीप !

दा. क्र. 6609
REFBK-0007649
REFBK-0907649